RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रविवार २१ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १७१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 21 June 2026 | Year : 6 | Issue : 171 | Daily | Rate: Rs. 5/-

**दि. 21 जून 2026**



१८८४- साता-यातील सैनिकांचा पहिला अर्ज रामजी बाबा आंबेडकरांनी लिहून सरकारला पाठवला.
१९२७- गव्हरमेंट लॉ कॉलेज मुंबई मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांची प्राध्यापक पदी नियुक्ती.

संकलन प्रा. यशवंत दुपटे









# उपवर्गीकरणाविरोधात अनुसूचित जातीसमुहाचा असंतोष

## संविधान चौकात राज्य शासनाविरोधात एकवटल्या ५९ जाती

**नागपूर :** अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करून जाती-जातीमध्ये भांडणे लावणे हे भाजपचे षयडंत्र आहे. अनुसूचित जातीत एकसंघ राहता कामा नये. त्यांच्या फूट पाडून राजकीय फायद्यासाठी उपवर्गीकरण करण्यात येत आहे, असा आरोप करीत भाजपच्या या उपवर्गीकरणाविरोधात अनुसूचित जातीमधील सर्व जाती एकवटल्या आहेत. शासनाविरोधात आता एल्गार पुकारण्यात येणार असल्याचा निर्धार यावेळी मोर्चात करण्यात आला. दोन वर्षांपासून उपवर्गीकरणाचा विरोध होत आहे, परंतु पहिल्यांदा या महामोर्चातून एका नव्या क्रांतीला चालना मिळाली असल्याची भावना यावेळी विविध जातीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

दीक्षाभूमी चौकातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केल्यानंतर दीक्षाभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थपुतळ्याला अभिवादन करून मोर्चा सुरू झाला. चार वाजता मोर्चाला प्रारंभ झाला. मोर्चाचे पहिले टोक व्हरायटी चौकात होते, तर शेवटचे टोक दीक्षाभूमीवर होते. उपवर्गीकरणाच्या विरोधात मागील दोन वर्षात पहिल्यांदाच अनुसूचित जातीमधील ५९ जातींनी मोर्चात हजेरी लावली असून सुमारे २५ हजार नागरिकांनी संविधान चौकात उपवर्गीकरणाविरोधात शासनाविरोधात अंसतोष भडकल्याचे चित्र दिसून आले. मोर्चानंतर संविधान चौकात झालेल्या सभेचे संचालन प्रीतम प्रीर्यदर्शी यांनी केले. आभार क्रांती आगलावे यांनी मानले.

### हे उपवर्गीकरण नव्हेतर आरक्षण संपवायची प्रोसेस

अनुसूचित जाती संवर्गात ५९ जाती आहे . 'अ, ब, क, ड' अशी गटवारी करणे, ह केवळ घटनात्मक प्रश्न नसून सामाजिक एकता तोडण्याचे सरकारचे धोरण आहे. तर एकूणच अनुसूचित जाती नव्हेतर एकूणच आरक्षण संवपायची ही प्रोसेस भारतीय जनता पार्टीने सुरू केली आहे. या भाजपच्या षडयंत्राचा विरोध करण्यासाठी संविधान चौकात पहिल्यांदा अनुसूचित जातीची संघटीत शक्ती दिसून आली. यामुळे केवळ एका जातीला खुश करण्यासाठी घेतलेला शासनाचा निर्णयावर पावसाळी अधिवेशनात फेरविचार करावा, उपवर्गीकरण रद्द करावे अशी एकमुखी मागणी सरकारने केली.

### महापुरुषांचे फलक, तिरंगी झेंड्यांचे आकर्षण

अत्यंत शिस्तबध्द पद्धतीने निघालेल्या मोर्चात लहान मुलांपासून विद्यार्थी, तरूण, महिला, पुरूष आणि साठी उलटेलेले अनुसूचित जातीमधील विविध समाजातील सर्व घटकांचे प्रतिनिधी होते. याशिवाय या मोर्चाचे विशेष आकर्षण असे की, राज्य सरकारच्या उपवर्गीकरणाच्या कृतीचा निषेध करण्यासाठी मोर्चात सहभागी जनतेच्या हातात छत्रपती शिवाजी महाराज, आरक्षणाचे जनक राजर्श्री छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, संत रविदास यांचे फलक तसेच प्रत्येकाच्या हातात राष्ट्रनिर्माणाचा संदेश देण्यासाठी तिरंगा ध्वज होता. तर नागरिकांनी संविधानाचा विजय असो, उपवर्गीकरण करणाऱ्या शासनाचा धिक्कार असो, आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कोणाच्या बापाचे, आरक्षण विरोधी सरकार मुर्दाबाद अशा घोषणा मोर्चेकऱ्यांनी दिल्या.

### क्षणचित्रे...

- -दीक्षाभूमी चौकातून शांत, संयमीपद्धथीने निघालेला मोर्चा
- -शिस्तबद्ध मोर्चात चहा, नाश्ता, पाणी आणि जेवणाची व्यवस्था
- -कडक उन्हातही विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून आले आंदोलक
- -आटोसंघटनेचे नेते विलास भालेकर यांनी थंड ज्यूसची केली सोय
- -छत्रपती शिवाजी, शाहू महराज, महात्मा फुले, डॉ. आबंडकर संत रविदास, लोकशाहीरांचे फोटो
- -राजकिय पक्षांनी भूमिका जाहीर करावी अशी एकमुखी मागणी

### मोर्चाचे आयोजनकर्ते

उपवर्गीकरणाविरोधात विदर्भातील चंद्रकांत सरदार, चंदन हाथगडे, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ. अशोक उरकुडे, इंजी. अरविंद गेडाम, इंजी. कुलदीप रामटेके, इंजी. प्रदीप नगरारे, राजीव खोब्रागडे, निवृत्त प्राचार्य सच्चिदानंद दारुण्डे, ॲड. स्मिता कांबळे, डॉ. सरोज आगलावे. तक्षशिला वाघधरे, ॲड. पायल गायकवाड, ॲड. आकाश मून, अतुल खोब्रागडे, पुष्पा बौद्ध, तक्षशिला वाघधरे, छाया खोब्रागडे, अनिल जवादे, किशोर भगत, धम्मा कांबळे, विजय तमगाडगे, रोहिदास राऊत, अंकुश वाकडे, सुरेश पाटील, अतुल सतदेवे, मच्छिन्द्र साळवे, डॉ. सुचित बागडे, करुणा तभाने, अनिल जवादे, माधवी जांभुळकर, अतुल सतदेवे, दिलीप वावरे, रोहिदास राऊत, सागर शंभरकर, राजकुमार चिवटे, डॉ. चेतना सवाई, प्रकाश कांबळे, गणेश बोरकर, रमेश कटके, अमृत बन्सोड, तक्षशीला वागधरे, सेवानिवृत्त पोलिस अधीक्षक किसन बेरिया, अशोक जंजाळ, राजकुमार वंजारी, विश्वास पाटील, पायल लोकरे, श्रीराम बन्सोड, सच्चिदानंद फुलेकर.

# 'कॉक्रोच जनता पार्टी'चे दिल्लीत 'थाळी-चमचा' वाजवून जोरदार आंदोलन

## अभिजीत दिपकेंच्या 'गो प्रधान गो'च्या घोषणा





**नवी दिल्ली :** देशातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या आणि परीक्षांमधील पेपर फुटीच्या प्रकरणांवरून 'कॉक्रोच जनता पार्टी'ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आज 'कॉक्रोच जनता पार्टी'तर्फे दुसरे मोठे जनआंदोलन छेडण्यात आले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलकांनी 'गो प्रधान गो' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

### 'थाळी-चमचा' वाजवून अनोखा निषेध

आंदोलनापूर्वीच CJP चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना सोबत 'थाळी आणि चमचा' आणण्याचे आवाहन केले होते. कोरोना काळातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'थाळी वाजवा' आवाहनाचा दाखला देत दिपके यांनी सरकारवर खोचक टीका केली. "जंतर-मंतरवरील आंदोलनात सहभागी होणाऱ्या सर्व 'कॉक्रोच'नी (समर्थकांनी) सोबत थाळी आणि चमचा घेऊन यावे, पुढील गोष्ट तुम्हाला माहितीच आहे," असा व्हिडिओ दिपके यांनी सोशल मीडियावर शेअर केला होता. आज दुपारी १ वाजल्यापासून सुरू झालेल्या या आंदोलनात दिल्ली आणि शेजारच्या राज्यांतून हजारो विद्यार्थी थाळी-चमचे वाजवत सरकारचा निषेध करताना दिसत आहेत.

### पंतप्रधान मोदींना खुले पत्र आणि १ कोटींच्या भरपाईची मागणी

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अभिजीत दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक खुले पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी देशातील तरुण विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याविषयी आणि ढासळत चाललेल्या शिक्षण व्यवस्थेविषयी तीव्र चिंता व्यक्त केली.

"मी अत्यंत जड अंतःकरणाने हे पत्र लिहीत आहे. देशाचे भविष्य असणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. गेल्या महिनाभरापासून कॉक्रोच जनता पार्टी देशभरात आंदोलन करत आहे. आम्हाला केवळ सरकारकडून या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी आणि उत्तरदायित्व हवे आहे," असे दिपके यांनी पत्रात नमूद केले.

गेल्या काही आठवड्यांत परीक्षांमधील घोळ आणि तणावामुळे ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा दावा दिपके यांनी केला आहे. आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना सरकारने तातडीने ₹१ कोटींची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिक्षण व्यवस्थेतील या गोंधळाला संपूर्णपणे जबाबदार धरून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी. अशा मागण्या पत्रात करण्याच आल्या आहेत.

### आंदोलनाचा वाढता जोर

याआधी दिल्लीत झालेल्या आंदोलनाच्या तुलनेत आज जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. हातामध्ये 'धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या' अशा आशयाचे फलक घेऊन तरुण वर्ग रस्त्यावर उतरला होता. 'Gen Z' म्हणजेच आजच्या तरुण पिढीने चालवलेले हे आंदोलन आता देशभरात चर्चेचा विषय ठरत असून, सरकार यावर काय पाऊल उचलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# होर्मुझ पुन्हा बंद, तेहरानचा कडक इशारा

## इराण-अमेरिका करार पूर्णपणे धोक्यात



**नवी दिल्ली :** 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'बाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. इराण-अमेरिका करार धोक्यात आला आहे. इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने, संघर्ष संपवण्यासाठीच्या सामंजस्य कराराचे अमेरिकेने केलेले उल्लंघन, दक्षिण लेबनॉनमधून सैन्य मागे घेण्यास आलेले अपयश आणि इस्त्रायलकडून शस्त्रसंधीचे सतत होणारे उल्लंघन, ही कारणे देत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक बंद करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे आता जागभरात पुन्हा खळबळ उडाली आहे.

इराणने याला पहिले पाऊल म्हटले असून, उल्लंघन सुरूच राहिल्यास पुढील पावले उचलली जातील असा इशारा दिला आहे. अमेरिका आणि इराणने या आठवड्यात एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली होती, यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यात आली. या कराराला अजून एक आठवडाही पूर्ण झालेला नाही.

दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी करार झाल्याची बातमी आल्यानंतर काही तासांतच, शनिवारी दक्षिण लेबनॉनमध्ये इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात दोन मुलांसह किमान सात जण ठार झाले.

### शांतता करार धोक्यात

इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर पुन्हा निर्बंध लादल्यामुळे कराराभोवतीचे संकट अधिकच गडद झाले आहे. दरम्यान, पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी शनिवारी इराणमध्ये दाखल झाले. वॉशिंग्टन आणि तेहरान यांनी शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने एका करारावर स्वाक्षरी केल्यानंतर काही दिवसांतच त्यांचा हा दौरा होत आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या वाटाघाटींवर नक्वी देखरेख ठेवतील आहे.





# नागपुरात वैज्ञानिक उपकरणांच्या कंपनीला भीषण आग

## 80 लाखांचे नुकसान

**नागपूर:** येथील काचीपुरा भागातील सेंट्रल सायंटिफिक कंपनीच्या कार्यालयाला शनिवारी दुपारी १२.१५ वाजेच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत कंपनीतील वैज्ञानिक उपकरणे, प्रयोगशाळेची साधने, रसायने आणि संगणक जळून खाक झाले असून, प्राथमिक अंदाजानुसार सुमारे ८० लाख रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे.

काचीपुरा भागातील एका दोन मजली इमारतीत संजय अरोरा यांच्या मालकीची सेंट्रल सायंटिफिक कंपनी आहे. या कंपनीमार्फत विविध रुग्णालयांना वैज्ञानिक उपकरणे, प्रयोगशाळेची साधने आणि रसायनांचा पुरवठा केला जातो. शनिवारी दुपारी या कंपनीच्या स्टोअररुममधून अचानक धूर निघत असल्याचे परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आले. कंपनीत रसायने आणि वैज्ञानिक साहित्याचा मोठा साठा असल्याने काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण कार्यालयाला वेढले. घटनेची माहिती मिळताच नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हिल लाईन्स आणि त्रिमूर्ती नगर अग्निशमन केंद्राच्या दोन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशामक दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले.

### ११ संगणक आणि ३ एसी जळून खाक

या भीषण आगीत कार्यालयातील इलेक्ट्रिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, ११ संगणक आणि ३ एसी जळून खाक झाले. अग्निशामक दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे आग वेळीच आटोक्यात आली, ज्यामुळे आजूबाजूचा परिसर सुरक्षित राहिला आणि कंपनीचे पुढील कोट्यवधी रुपयांचे नुकसान टळले. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

# सिकलसेल एक्सलन्स सेंटर प्रकल्प आठ वर्षांपासून रखडला; रुग्णांची प्रतिक्षा कायम

**नागपूर :** जागतिक सिकलसेल दिनानिमित्त पुन्हा एकदा नागपूरातील प्रस्तावित 'सिकलसेल एक्सलन्स सेंटर' प्रकल्पाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सिकलसेल रुग्णांचे अचूक निदान, अत्याधुनिक उपचार आणि संशोधनासाठी उभारण्यात येणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प गेल्या आठ वर्षांपासून कागदावरच असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. २०१८ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडिकल), नागपूर आणि सीएसआयआर यांच्यात सामंजस्य करार झाला होता. या प्रकल्पात अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधन सुविधा आणि तज्ज्ञ मनुष्यबळाची तरतूद करण्यात येणार होती. मेडिकल परिसरात जागाही निश्चित करण्यात आली होती. करारानुसार सुमारे दोन कोटी रुपयांची प्रयोगशाळा उभारण्याची जबाबदारी सीएसआयआरवर होती. मात्र, त्यानंतर प्रकल्पाला गती मिळाली नाही. परिणामी, विदर्भातील हजारो सिकलसेल रुग्णांना अत्याधुनिक तपासणी व उपचारांच्या सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. संशोधनासाठी आवश्यक माहिती संकलन आणि रुग्णांच्या नमुन्यांच्या तपासणीचे कामही रखडले आहे. पेशंट राईट फोरमचे समन्वयक राज खबरे यांनी सरकारने तातडीने हा प्रकल्प सुरू करून सिकलसेल रुग्णांना जागतिक दर्जाच्या उपचारांची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकल्पाबाबत अधिकृत स्तरावर पुढे काय निर्णय झाला, याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विदर्भातील सिकलसेल रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

जागा पाहिजे
प्रसिद्ध को. ऑप. बँके करिता, एक्स्टेंशन काऊंटरकरिता 400 ते 500 स्केअर फूटची अजनी पोलीस स्टेशन ते त्रिशरण चौक, नागपूर पर्यंत शॉप किंवा घर ग्राउंड लेवलवर जागा पाहिजे.
त्वरित संपर्क करा
8956453801
7385641111

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
IDEAL FOR
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus • Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown • Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

21 June 2026 page 02_Layout 1 6/20/2026 6:37 PM Page 1



# चिकित्सा




एका गावात दोन माणसे होती.. पहिला म्हणायचा, “हा मंत्र फार प्रभावी आहे.”
दुसरा विचारायचा, “कसा?”
पहिला म्हणायचा, “आमच्या खापर पण जोबाने सांगितलेय.”
“पण तो नेमका कसा काम करतो?”
“त्यात व्हायब्रेशन्स असतात.”
“अच्छा पण ते कसे काम करतात?
“माहीत नाही.”
“कधी तपासलेत?”
“गरज काय? श्रद्धा असली की सगळे होते..”

विज्ञानाचा इतिहास पाहिला तर तो अशा उत्तरांवर कधीच समाधानी बसलेला नाही.. ज्यूल्स बॉर्देतसारखे शास्त्रज्ञ नेमके इथेच वेगळे ठरतात. त्याच्या काळातही लोकांना हे माहीत होते की काही व्यक्ती रोगातून बऱ्या होतात, काहींना रोग पुन्हा होत नाही, रक्तात काहीतरी शक्ती असतेण. पण ‘काहीतरी असते’ इथपर्यंत विज्ञान थांबले नाही.. बॉर्देतने प्रश्न विचारला, “ते काहीतरी नेमके काय आहे?” जीवाणूंचा शोध लागला होता, अनेक संसर्गजन्य रोगांची कारणे समजू लागली होती; पण शरीर या आक्रमक शत्रूंशी नेमके कसे लढते? हा प्रश्न अजूनही गूढच होता. आज कोविड, डेंग्यू, क्षयरोग किंवा इतर संसर्गजन्य रोगांविरुद्ध शरीराची प्रतिकारशक्ती कशी काम करते? याची जी मूलभूत समज आपल्याला आहे तिच्या पायाभरणीत बॉर्देत यांचा सिंहाचा वाटा आहे..

त्या काळात शास्त्रज्ञांना माहिती होते की रक्तातील काही घटक जंतूंना नष्ट करतात. पण हे नेमके कसे घडते याचे उत्तर कुणाकडे नव्हते..

बॉर्देतने अथक प्रयोग सुरू केले. त्याने पाहिले की रक्तातील प्रतिपिंडे अर्थात ॲंटिबॉडी एकटी पुरेशी नसतात. त्यांच्यासोबत आणखी एक अदृश्य घटक काम करत असतो आणि हाच घटक जंतूंवर अंतिम घाव घालतो.. १८९५ मध्ये त्यांनी या रहस्यमय घटकाचा शोध लावला. आज आपण त्याला कॉम्प्लिमेंट सिस्टिम म्हणतो. हे जणू युद्धातील विशेष कमांडो दलच.. प्रतिपिंडे शत्रूची ओळख पटवतात तर कॉम्प्लिमेंट प्रणाली त्या शत्रूचा नायनाट करते. आज इम्युनॉलॉजीच्या प्रत्येक पाठ्यपुस्तकात या प्रणालीला केंद्रस्थानी स्थान आहे.. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ‘डांग्या खोकला’ हा बालमृत्यूचे एक प्रमुख कारण होते. मुलांना तीव्र खोकल्याचे झटके येत, श्वास घ्यायला त्रास होत असे आणि अनेकदा जीवही जात असे.. १९०६ मध्ये बॉर्देत आणि त्याच्या सहकाऱ्यांनी या रोगाला कारणीभूत असलेल्या जीवाणूला वेगळे करण्यात यश मिळवले. आज तो जीवाणू बॉर्देतेला पट्र्यूसिस या नावाने ओळखला जातो. लक्षात घ्या त्याच्या नावातच ‘बॉर्दे’ हे नाव कायमचे कोरले गेलेय.

या शोधामुळे पुढे डांग्या खोकल्यावरील लस विकसित होण्याचा मार्ग मोकळा झाला आणि लाखो बालकांचे जीव वाचले.

बॉर्देतला केवळ जीवाणू शोधण्यात रस नव्हता. त्याला रोगांचे निदान अधिक अचूक कसे करता येईल याचीही काळजी होती. त्याच्या संशोधनातून विकसित झालेल्या तत्त्वांचा वापर करून पुढे प्रसिद्ध वॉसरमॅन टेस्ट तयार करण्यात आली. त्याकाळी सिफिलिस हा जगभरातील एक गंभीर आणि कलंकित रोग मानला जात असे. रक्तातील प्रतिकारशक्तीच्या प्रतिक्रिया समजल्यामुळे हा रोग ओळखणे शक्य झाले आणि लाखो रुग्णांना वेळेत उपचार मिळू लागले.. काही वैज्ञानिकांचा शोध लगेच जगाला दिसतो. काहींचा शोध मात्र पडद्यामागे राहतो. पण संपूर्ण वैद्यकशास्त्र बदलून टाकतो; बॉर्देतचे काम दुसऱ्या प्रकारचे होते. त्याने ना एखादी भव्य शस्त्रक्रिया केली, ना एखादे चमकदार यंत्र तयार केले. त्याने रक्ताच्या एका थेंबात दडलेल्या सुक्ष्म संरक्षणव्यवस्थेचे रहस्य उलगडले. आज ज्या प्रतिकारशास्त्रावर आधुनिक लसीकरण, अवयव प्रत्यारोपण, ऑटोईम्यून रोगांचे निदान आणि अनेक अत्याधुनिक उपचार उभेत त्याच्या पाया बॉर्देतने घातलाय. या क्रांतिकारी कार्याबद्दल १९१९ मध्ये बॉर्देतला नोबेल प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार केवळ एका वैज्ञानिकाचा सन्मान नव्हता तर तो मानवी शरीराच्या संरक्षणव्यवस्थेचे गूढ उलगडण्याच्या प्रयत्नांचा गौरव होता.. आपल्या शरीरात रोज अब्जावधी जंतूंविरुद्ध युद्ध सुरू असते. आपल्याला त्याची जाणीवही होत नाही. त्या अदृश्य युद्धातील सैनिक कोण आहेत? ते कसे लढतात? शत्रूला कसे ओळखतात? कसे नष्ट करतात? याचा पहिला मोठा धागा शोधणारा माणूस म्हणजे ज्यूल्स बॉर्देत.. इतिहासात काही लोकांची नावे पुस्तकांच्या पानांवर राहतात; पण काहींची नावे विज्ञानाच्या शब्दकोशात कायमची कोरली जातात.. ‘बॉर्देतेला’ या जीवाणूच्या नावात आजही ज्यूल्स बोर्डे यांचे नाव जिवंत आहे एका अशा संशोधकाचे, ज्याने रक्तातील अदृश्य सैनिकांना जगासमोर आणले. वर्षानुवर्षांच्या प्रयोगांनंतर त्यांनी रक्तातील कॉम्प्लिमेंट प्रणालीचा शोध लावला म्हणजे शरीरातील अदृश्य सैनिकांचा.. आज आपण त्याबद्दल आत्मविश्वासाने बोलू शकतो. कारण त्यामागे निरीक्षण, प्रयोग, पुनर्परीक्षण आणि पुरावे आहेत. आपल्या देशात मंत्रोपचार, जप, स्तोत्रपठण, प्रार्थना, ध्यान, नामस्मरण यांची परंपरा हजारो वर्षांची आहे. पण गंमत अशी की या परंपरांचा सर्वात मोठा शत्रू टीकाकार नाहीत, तर त्यांचे ‘भक्त’ आहेत.. कारण टीकाकार प्रश्न विचारतो. भक्त प्रश्नच विचारू देत नाही.. ‘मंत्र काम करतो का?’ या प्रश्नाचे उत्तर ‘हो’ किंवा ‘नाही’ इतके साधे नाही. खरा प्रश्न आहे तो नेमका कसा काम करतो? ताप उतरतो की ताण उतरतो? श्रद्धा म्हणते, “हे खरे आहे, म्हणून मान.” विज्ञान म्हणते, “हे खरे असू शकते, पण आधी दाखव.” श्रद्धेला प्रश्नांची भीती वाटते. विज्ञानाला प्रश्नांची भूक असते. बॉर्देतला जर श्रद्धेवर समाधान मानायचे असते तर तो म्हणाला असता, “रक्तात काही अदृश्य शक्ती असते.” आणि गोष्ट तिथेच संपली असती. पण त्याने विचारले, “कोणती शक्ती? कुठे असते? कशी काम करते? ती मोजता येते का?” म्हणूनच त्यांचे नाव इतिहासात राहिले. मंत्रांवर संशोधन झाले तर? कल्पना करा उद्या एखाद्या संशोधनातून सिद्ध झाले की विशिष्ट प्रकारच्या मंत्रोच्चारामुळे मेंदूमध्ये काही विशिष्ट न्यूरोकेमिकल बदल होतात, ताण कमी होतो, रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते किंवा वेदना जाणवण्याची तीव्रता कमी होते, एमआरय रिपोर्ट बदलतो, तर त्याचा सर्वात मोठा फायदा कोणाला होईल? मंत्रोपचारांच्या विरोधकांना नाही. मंत्रोपचारांच्या समर्थकांनाच. कारण तेव्हा श्रद्धेला पुराव्याची जोड मिळेल. आज आपण अनेक गोष्टींबद्दल अभिमान बाळगतो. अभिमान बाळगण्यात गैर काहीच नाही. पण केवळ गुणगान केल्याने ज्ञान वाढत नाही.. गौरवगाथा आणि संशोधन यांत तितकाच फरक आहे जितका देवळातील घंटा आणि प्रयोगशाळेतील घंटी यांत असतो एक श्रद्धेला जागे करते दुसरी शोधाला.. ज्यूल्स बॉर्देतने रक्तातील अदृश्य सैनिकांचे रहस्य उलगडले. कारण त्यांनी परंपरेवर नव्हे तर प्रश्नांवर विश्वास ठेवला. कदाचित आपल्या मंत्रोपचारांचेही तसेच आहे. ते पूर्णपणे निरुपयोगी असतील, कदाचित काही अंशी उपयुक्त असतील किंवा कदाचित त्यांच्यात अजून न उलगडलेले विज्ञान दडले असेल पण एक गोष्ट निश्चित आहे. संशोधनाशिवाय गौरव म्हणजे नकाशाशिवाय प्रवास. प्रश्न विचारण्याची हिंमत नसलेली संस्कृती ज्ञाननिर्मिती करत नाही; ती फक्त जुन्या कथांची पुनरावृत्ती करत राहते.. ज्यूल्स बॉर्देत यांच्या अभिवादन निमित्त...

**बसौसे** ▪▪

# देवानंद पवारांची कविता माणसे जोडणारी




कवी देवानंद पवार यांचा 'सब्बे सत्था सुखी होन्तु!' हा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित होतो आहे. या कविता संग्रहाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मी देवानंद पवारांचे अंतकरणापासून अभिनंदन करतो. त्यांचा 'काळोखाला भेदणारा सूर्य' हा कवितासंग्रह २००९ या वर्षी प्रकाशित झाला. तो संग्रह 'महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने' प्रकाशित केला होता. देवानंद पवार प्रकृतीने कवी आहेत आणि मुख्यत्व त्यांनी कविता लेखनच केले आहे.

देवानंद पवारांची घडण औरंगाबादेच्या नागसेनवनात झाली. नागसेनवन म्हणजे आंबेडकरी चळवळीची रणभूमीच आहे. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणांनी हा परिसर सतत हेलावत असतो. या परिसरात रूजू होणारी मने ही चळवळीतच रूजू होत असतात. प्रत्येकच मनाची इथे नवरचना होत असते, मने दुथडी भरुन वाहायला लागतात. नव्या स्वप्नांसोबत बोलण्याच्या इच्छा या मनांमध्ये निर्माण होतात. हा जिवंत परिसर इथे येणाऱ्या मनांनाही जिवंत करतो. देवानंद पवार यांचे मानसिक निर्माण या परिसरात झालेले आहे. त्यांनी आता स्वतःचे बोधीपर्ण प्रकाशन' सुरू केले असून हे त्यांचे प्रकाशनच त्यांचा 'सब्बे सत्था सुखी होन्तु' हा कविता संग्रह प्रकाशित करीत आहे. कवी देवानंद पवार यांना मी या कविता संग्रहाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मनापासून सदिच्छा देतो. देवानंद पवारांनी आपल्या वैचारिक आदर्शांना एका कवितेत वंदन केले आहे. ते त्यांच्या जीवननिष्ठेवर प्रकाश टाकलेच, पण सर्वसामान्य लोकासंबंधीची त्यांची आस्थाही प्रकट होते. 'ओवी' या रचनाबंधातून ते आपणाला जाणवते. या कवितेतून बुद्ध, तुकोबा, जिजाऊ, छत्रपती शिवराय, जोतीराव फुले, सावित्री माई, छत्रपती शाहू, सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाई आणि अण्णाभाऊ साठे यांना त्यांनी वंदन केले आहे. या ओव्यांमधून कवीने लोकांच्या माणुसकीचा विकासमार्गच मांडलेला आहे.

या कवितेच्या लेखनाचा उद्देश कवीने अनेक ठिकाणी मांडलेला आहे. त्यातली काही ठिकाणे अशी - १. तरीही आम्ही करतो धडपड माणसासाठी माणसे जोडण्यासाठी. २. सब्बे सत्था सुखी होन्तु! म्हणत निर्माण व्हावी माणसे माणसाला जोपासण्यासाठी. ३. ठिणगीकडून वणव्याकडे जाणारी वाट म्हणजे तांडा. ४. चालत राहावे प्रकाशाच्या दिशेने काळोखाचे पडदे फाडत. ५. स्वातंत्र्याचे गाणे गात अंधाराला कापत कापत भीम सैनिक निघेल हातात बंडाचे निशाण घेऊन!' ६. मी त्यांना संविधान सांगतो समता, न्याय, स्वातंत्र्य सांगतो. ७. निळा, भगवा, हिरवा, पिवळा, लाल, यांना एकत्र करून गडद व्हायचेय माणसासाठी. ही सर्व अवतरणे हे सांगतात की, कवीला सामाजिक सलोख्याची उत्कट तहान लागलेली आहे. ही गोष्ट मला विशेषच महत्त्वाची वाटते. या ध्येयाकडे जाण्यासाठी कवीने आपल्यापुढे बुद्धाच्या प्रज्ञानाचा उजेड अंथरलेला आहे. त्याला माणसांच्या उद्धारासाठी बंधुभाव - भगिनीभाव हवा. कवी विचारमंथन नाकारीत नाही, पण आता विचारसंस्कृतीला कृतीसंस्कृतीची जोड द्यायला हवी, असे कवीला प्रकर्षाने वाटते. ‘आता खूप झाले विचाराचे मंथन करून. आता व्यवस्थेच्या या सिरिअल किलरला मला दीक्षा द्यायची आहे. माणसाची जगात शांतता नांदावी म्हणून आम्हाला युद्ध नको बुद्ध हवा. फक्त माणसासाठी! फक्त माणसासाठी ‘बुद्धाने मानवी जीवनाचा एकमेव नायक माणूसच आहे,’ हे सांगितले. बुद्धिमत्ता हीच माणसाची सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. या बुद्धीने निरर्थकांमध्ये भराऱ्या घेण्यापेक्षा फक्त माणसाची महत्ता वा माणसाचे महानायकपण मांडावे. मानवी बुद्धिमत्तेचा याहून दुसरा मोठा सन्मान कोणालाही करता येत नाही. हीच गोष्ट डॉ. बाबासाहेबही सांगतात आणि बुद्ध वा डॉ. बाबासाहेब यांनी मानवी जीवनासाठी युद्धविहीनता हेच ध्येय परम मानले. हिंसेच्या मार्गाने माणसे मारता येतात. माणसे ही आणि माणुसकीची हिंसेच्या मार्गाने जगवता येत नाहीत. जीवनाला उजेडगामी करणारा हाच शहाणा (विस्डममय) सिद्धान्त आहे आणि त्याचा उच्चार कवीने प्राथम्याने या कवितासंग्रहात केला आहे. कवीच्यापुढे युद्ध आहे ते स्वाभिमानाचे! सेल्फ रिस्पेक्टचे! आजची धर्मांधता आणि धर्मनिरपेक्षता यातील तीव्र संघर्ष कवी मांडतो. बेरोजगारीसारखे तरुणांचे प्रश्न, झुंडशाही, शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रश्न असे सर्व प्रश्न सुटावेत, असे कवीला वाटते आणि त्यासाठीच कवी म्हणतो - 'म्हणून आम्ही होतो मार्गस्थ, शिव-भीम मार्गाने ' आणि याप्रकारे शिवाजी राजे आणि डॉ. बाबासाहेब यांच्या सर्वसन्मानदायी भूमिकांचा एकमय ध्वज खांद्यावर घेतो.


डॉ. यशवंत मनोहर

छत्रपती शिवाजी राजांनी जाती-धर्मांवरुन माणसांमध्ये भेद केला नाही. त्यांनी माणसाच्या सभ्यतेवरुन माणसाचे मूल्य ठरवले. डॉ. बाबासाहेबांनी तर एकव्यक्ती एकमूल्य सांगितले. सर्व भारतीय समान आहेत. जाती, धर्म, पंथ, प्रांत, वंश या सर्वच ओळखीपुढे 'आम्ही केवळ भारतीय आहोत' हा महान आदर्श ठेवला. विविधतेत जहर कालवणारी विषमता त्यांनी नाकारली. भारतीयांपुढे असे निखळ भारतमय भारताचे स्वप्न ठेवले. कवीला या उजेडाच्या दिशेच्या हाका ऐकायला येत आहेत आणि त्या हाकांच्या दिशेने कवी निघालेला आहे, असे मला वाटते. डॉ. बाबासाहेबांनी भारतातील ऐंशी टक्के लोकांना म्हणजे स्त्रिया, ओबीसी, आदिवासी, भटके-विमुक्त, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध आणि इतर ही सर्व अधःपतितांना हे सांगितले की, 'माझ्या संविधानाने तुम्हाला तत्त्वतः देशाचे नायक करून ठेवले आहे. तुम्ही सर्व एकत्र या आणि निवडणुकीच्या मार्गाने देशाचे शासनकर्ते व्हा... पण हे सर्व लोक व्यवस्थेने चारलेल्या जाती धर्माच्या अफूने झिंगत आहेत. त्यामुळे आपल्यातल्या चौकटी सोडायला तयार होत नाहीत. ही माणसे अन्याय सहन करीत राहतात, पण एकत्र येऊन अन्यायमुक्त भारत निर्माण करीत नाहीत. कवीने याबद्दल खंत व्यक्त केली आहे. कवीने 'जखम' या कवितेत' 'आंबेडकरवादाची' गरज बोलून दाखविली आहे. कोरोनाच्या महामारीचा संदर्भ देऊन इतिहासातील निरंतर लॉकडाऊनचा निर्देश कवीने केला आहे. माणसांना जातीमध्ये, पोटजातीमध्ये धर्मांमध्ये आणि अहंकारांध्ये बंद केले. हे लॉकडाऊन भारतात करणाऱ्या सांस्कृतिक कोरोनाचा निर्देश कवीने केलेला आहे.देवानंद पवार यांच्या कवितासंग्रहात असे कवीचे मन व्यक्त होते आणि ते माणसांना, माणसांच्या भल्यासाठी एकत्र गुंफणारेच आहे. ही जाती, धर्म यांनी दूषित झालेल्या आजच्या राजकारणाच्याऐवजी जाती, धर्मविहीन संविधानमय राजकारणाची प्रस्थापना करणारी कविता आहे. कवीला सदिच्छा! सब्बे सत्था सुखी होन्तु! ●●

काव्यसंग्रह : देवानंद पवार
पृष्ठे : 80
मूल्य : 150
बोधीपर्ण प्रकाशन, औरंगाबाद
संवाद : 9158359628
bodhiparnprakashan@gmail.com

# जळाली जिंदगी

जखमांची राख झाली, जळाली जिंदगी
विरहाची रात्र आली, जळाली जिंदगी..//1//

उभे होते स्वप्न सारे, किनाऱ्यावरी कधी
लाटांनी ती बुडाली, जळाली जिंदगी ..//2//

कुणी ना वेदना जाणे, कुणी ना अश्रू पुसले
मनाची वात विझली, जळाली जिंदगी..//3//

फुलांना गंध होता, वसंताचाही सहवास
नशिबाची नजर फिरली, जळाली जिंदगी..//4//

किती विश्वास ठेवावा, मुखवट्यांच्या जगावर
फसवणुकीत हरवली, जळाली जिंदगी..//5//

दयेचा थेंब ना मिळाला, उन्हांच्या गावामध्ये
तहान अंतरी जपली, जळाली जिंदगी..//6//

'रंगराज' शब्द गाती, व्यथांची ही कहाणी
गझल ओठीच थांबली, जळाली जिंदगी ..//7//

**- रंगराज गोस्वामी**





## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

# करा योगाभ्यास

उठोनी प्रभात काळी,
करा योगा अभ्यास
होईल मन प्रसन्न
लाभेल दिर्घायुष
करिता योगाभ्यास नित्य,
लाभे समाधान सौख्य
निरोगी सुंदर काया,
योगा देई आपणांस
योगा सराव ठेवी,
सुदृढ सशक्त शरीरास
मन होई प्रसन्न,
लाभे एकाग्रता चित्तास
ठेवी सामान्य रक्ताभिसरण,
लवचिकता लाभे शरीरास
प्राणवायूचा संचार उत्तम,
नव गती देई जीवनास
होई बचत वेळेची,
अणि अर्थाची खास
आधी-व्याधी जवळ न येई,
करिता नियमित योगाभ्यास
लाभता निरामय शरीर,
आनंद वाटे जीवास
सांगून गेले स्वामी जनार्दन,
करा हो निरंतर योगाभ्यास
करा हो निरंतर योगाभ्यास

**- चंद्रकांत सावळकर**

# हा न्याय कुठला

पेपर फुटला, हा,
न्याय कुठला विद्यार्थ्यांची मेहनत वाया गेली
बापही तुटला आता भविष्य अंधारात,
पैसाही लुटला भविष्यासी,
खेळणं हा न्याय कुठला .. १...
भरमसाठ टॅक्स घ्या,
देश वाचवा तिजोरी लुटून
न्यायाधीशांना देशाबाहेर नाचवा असा,
जनतेचा पैसा नासवा सामान्यांचा
‘न्याय’ दूर पाठवा.. २..
आता देश कोणी म्हणतो देश खत्र्यात आहे
देशाचा पैसा लुटत असताना डोळे झाकत आहे
कोणी देश विकत आहे,
कोणी घेच आहे संपत्तीचे एकाधिकरण,
हा न्याय कुठला... ३..
सरकारी उद्योग सर्व विकून टाकले
बेरोजगारांना देणार काम कुठले शिक्षण,
रोजगार नाही जीवनात ‘राम’ कुठले चोरी करतात
पुजारी, हा न्याय कुठला.. ४..
आता प्रदूषित नद्या,
प्रदूषित वायू प्रदूषित परिसर,
प्रदूषित झाली आयू प्रदूषित विचार,
प्रदूषित आचरण लोभापाई जातीभेद आणि अंधानुकरण..५... ..
हा न्याय कुठला...
पैसाच सर्व काही तिथे ‘नीतिमत्ता’ नाही
जनतेने निवडून दिले त्यांची परवा नाही
आज या पार्टीत उद्या त्यात,
आम्ही कुणाचे नाही जाती कुत्र्या समान लाळघोटीत,
कुणाचीही पर्वा नाही.६.
‘हा न्याय कुठला...’

**- इंजि. शुद्धोधन बडवणे**

# योग करू या, निरोगी राहू या!




गुरुदेवनगरमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उत्साहपूर्ण वातावरण होते. नगरसेविका दिव्याताई, चार योगशिक्षक आणि परिसरातील अनेक महिला यांच्या उपस्थितीत योग दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी संध्याताईंनी परिसरातील सर्व महिलांना आवर्जून निमंत्रित केले होते. काही जणी उत्साहाने तर काही जणी उत्सुकतेपोटी कार्यक्रमात सहभागी झाल्या. सभागृहात सर्वांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केल्याने प्रसन्न वातावरण निर्माण झाले होते. स्वागतानंतर योगशिक्षिका मंगला मॅडम यांनी प्रास्ताविक करत सांगितले की, आज केवळ योगाचे महत्त्व सांगितले जाणार नाही, तर विविध योगासनांचे प्रात्यक्षिकही तज्ञ विद्यार्थिनींकडून करून दाखविले जाईल आणि त्यांचे आरोग्यदायी फायदेही समजावून सांगितले जातील. यानंतर प्रमुख मार्गदर्शक ढबाले सर यांनी योग दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. योग म्हणजे शरीर, मन आणि श्वास यांचा समतोल साधणारी आरोग्यदायी जीवनशैली आहे. नियमित श्वसन, संतुलित हालचाली आणि एकाग्रता यांमुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते. आजच्या धकाधकीच्या जीवनात, अनियमित आहार, अपुरी झोप आणि तणावामुळे अनेक आजार वाढत आहेत. अशा परिस्थितीत नियमित योगाभ्यास अत्यंत उपयुक्त ठरतो. पुढे महिलांनी आपल्या आरोग्यविषयक समस्या मांडल्या. कोणाला पाठदुखी, कंबरदुखी, झोप न लागणे, थकवा किंवा दम लागण्याचा त्रास होता. त्यावर ढबाले सर यांनी स्पष्ट केले की, घरकाम आणि व्यायाम यात मूलभूत फरक आहे. घरकाम करताना शरीराचा मर्यादित वापर होतो, तर योगासनांमुळे शरीराच्या सर्व स्नायूंना संतुलित व्यायाम मिळतो. त्यामुळे शरीर अधिक लवचिक, सक्षम आणि निरोगी राहते. त्यानंतर कातुरे सर यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून त्यांचे फायदे सांगितले. ताडासनामुळे संतुलन क्षमता वाढते, वृक्षासनाने एकाग्रता सुधारते, भुजंगासनाने पाठीचा कणा लवचिक होतो, वज्रासन पचनक्रियेसाठी उपयुक्त ठरते, बालासनामुळे मानसिक शांतता मिळते, पवनमुक्तासन बद्धकोष्ठतेपासून आराम देते, कटीचक्रासनामुळे मान, पाठ आणि कंबर मजबूत होतात, चक्की चलनासन पोटावरील चरबी कमी करण्यास मदत करते, तर नौकासन आणि धनुरासन शरीराचा समन्वय व पचनक्रिया सुधारण्यास उपयुक्त ठरतात. यानंतर योगशिक्षिका माधुरी मते मॅडम यांनी प्राणायामाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, नियमित प्राणायामामुळे फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते, मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता वाढते आणि मन शांत राहते. अनुलोम-विलोम, नाडीशोधन, भ्रामरी आणि शीतली यांसारख्या प्राणायाम प्रकारांचा योग्य पद्धतीने सराव केल्यास रक्तदाब नियंत्रणात राहण्यास, तणाव कमी होण्यास आणि झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. त्यांनी संतुलित आहार, पुरेसे पाणी, नियमित व्यायाम आणि ध्यान यांचे महत्त्वही अधोरेखित केले. नियमित व्यायामामुळे शरीरात एंडॉर्फिनसारख्या आनंददायी रसायनांची निर्मिती होते, ज्यामुळे तणाव कमी होतो, सकारात्मकता वाढते आणि मानसिक आरोग्य सुधारते. यामुळे हृदयाचे आरोग्य, रक्तातील साखरेचे प्रमाण, रक्तदाब आणि रोगप्रतिकारशक्ती यांवरही सकारात्मक परिणाम होतो. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिलांनी नियमित योगवर्गात सहभागी होण्याचा निर्धार व्यक्त केला. मंगला मॅडम यांनी सर्व मान्यवर, प्रशिक्षक आणि उपस्थितांचे आभार मानले. आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांच्या पसंतीस उतरला.●●


प्रणोती कळमकर
मो. 9834209457

# भाजपचा अतिरेक त्याचा नाश करेल !

इतरांना गुलाम करून त्यांचेवर हुकूमत गाजवणे हा संघ - भाजपचा स्वभाव आहे हे आता सर्वांच्या लक्षात आले आहे.

कोणताही हुकुमशहा, चोर, लुटारू, बदमाश सुरुवातीला चांगुलपणाचे नको तेव्हढे ढोंग करतो. लोकांना तो खूब चांगला वाटतो. आपला हितकर देशभक्त, त्यागी, सेवा करणारा वाटतो. लोकांचा विश्वास संपादन करत आपली शक्ती मुंगी पावलाने वाढवतो. जसजशी शक्ती वाढते तसतसे त्याचे लोकांवर गुन्हावणे सुरू होते. चाणाक्ष लोकांच्या जेव्हा हे लक्षात येते तेव्हा तो त्याचेबद्दल लोकांना सावध करण्यासाठी प्रयत्न करतो. पण लोक त्यालाच दुष्ट समजतात. चांगल्या लोकांना हा वाईट म्हणतो, हाच बदमाश आहे, असे म्हणत जागृत झालेल्या लोकांना अल्पमतात यावे लागते. त्याचा लाभ घेत हा ढोंगी समूह जागृत लोकांचा छळ सुरू करतो. त्यासाठी तो आपल्याच लोकांना वापरतो. धीरे धीरे त्याचा अतिरेक वाढत जातो. आपली फसवणूक झाली हे आता लोकांचे लक्षात आले असते. आता तो सर्वांवर अन्याय करू लागतो. लोकांजवळ उपाय नसतो. वेळ निघून गेला असतो. आपसात आपण भांडत राहतो. आपल्याच लोकांना आपण टोमणे मारत राहतो. प्रत्येक जन नाराज असतो. दुष्ट लोकांविरुद्ध कुणीतरी लढावे याची लोक वाट पाहात असतात. वादळापूर्वीची शांतता पसरली असते. दुष्टाला वाटते लोक आता आपल्या गुलामीत अडकले. त्यामुळे त्याचा अतिरेक सुरू होतो. त्यातून ज्यांना आपले मरण समोर दिसते ते शेवटी जीवावर उदार होऊन लढा देऊ लागतात. त्यातून लोक लढा सुरु होतो. शेवटी दुष्टांचा अंत होतो. ती वेळ आज संघ - भाजपाची आली आहे.

महाराष्ट्रात शिवसेनेच्या खांद्यावर बसून भाजप मोठा झाला. ‘महाराष्ट्रात तुम्ही दिल्लीत आम्ही’ हा करार होता. दिल्लीत जसा भाजप मोठा झाला तसा महाराष्ट्रात शिवसेनेचा घात केला. बिहारमध्ये नितीशकुमार यांचा घात केला. ओरिसात बीज्यू पटनायक यांचा घात केला. दिल्लीत केजरीवाल यांचा घात केला. महाराष्ट्रात शरद पवारांचा घात केला. नवीन शिक्षण नीती लोकांना मनुस्मृतीचे काळात नेऊन विद्याहीन, धनहीन, सत्ताहीन करणारी आणली. बेरोजगारी वाढावी आणि लोक गुन्हेगारीकडे वळावेत हा डाव टाकला. विद्यार्थी अनेक वर्ष मेहनत करतात आणि परीक्षा देतात. संघ - भाजप पेपर लीक करून त्यांना आत्महत्या करण्यासाठी मजबूर करतो. त्यांनी स्पर्धा करू नये. गुलामी करावी ही भाजपची भूमिका आहे. भाजपचे खरे रूप हळू हळू समोर येऊ लागले. इराण हा भारताचा पारंपरिक मित्र देश आहे. भाजपने इराण सोडून नरभक्षी इस्राएल - अमेरिकेची गुलामी स्वीकारली आणि इराणसोबत दगाबाजी केली. इतक्या वर्षाचे संबंध तोडले. भारताची नाचक्की झाली. भाजपचा हुकूमशाही चेहरा उघड होऊ लागला. लोकांनी निवडून दिलेली सरकारे पाडण्यासाठी इडी, सीबीआय, निवडणूक आयोग आणि न्यायालय यांचा दुरुपयोग केला. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांची पायमल्ली केली. स्वायत्त संस्था आणि मिडिया आपल्या बटिक बनवल्या. देशातील लोकशाही नावापुरती ठेवली. निवडणुका नाममात्र आणि देखावा म्हणून घेण्यात येतात. कोणत्या पक्षाला किती जागा द्यायच्या निवडणूक आयोग आणि भाजप ठरवते. न्यायालय नावापुरते राहिले. लोकांचा विश्वास उडाला. या सर्व गोष्टींचा विचारकरता लोक निराश झाले. भाजपने जो अतिरेक केला, त्याला विरोध करण्यासाठी लोक संधी शोधत होते ती त्यांना मिळाली. पेपर लीक कांडाने संघ - भाजपने अतिरेक केला. देशभर मुले खवळली आणि रस्त्यावर उतरून ते शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करीत आहेत. सिजेपी आणि काँग्रेसचे एन.एस.सी.वाय. या विद्यार्थ्यांनी देशभर आंदोलन सुरू केले. प्रधान संघ प्रतिनिधी म्हणून सरकारमध्ये शिक्षणमंत्री आहे. त्याला काढले तर संघ बदनाम होतो, नाही काढले तर मुले आक्रमक होतील.




ममता बॅनर्जी यांच्यावर केलेला अन्याय आणि अमेरिका इस्रायल समर्थन सरकारच्या या दोन बाबी लोकांना आवडल्या नाहीत. जशी मुले रस्त्यावर उतरली तसे लोक आंदोलनाच्या मानसिकतेत आले. या स्थितीतून भाजप आता बाहेर पडू शकत नाही. भाजपची पायली भरली आहे. आता तो ढोंग लपऊ शकत नाही. म्हणून त्याने केलेल्या पुढील प्रहाराने आपण उठून उभे राहू शकणार नाही ही पाळी येण्याआधी देशवासीयांनी भाजपवर असा प्रहार करावा की तो परत उठून उभा होणार नाही. आताचा क्षण तसा आहे. आज पेपर लीक प्रकरण देशव्यापी आहे. ती एका धर्माची, जातीची, प्रांताची समस्या नाही. ती सार्वजनिक समस्या आहे. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान केवळ शिक्षणमंत्री नाही तर तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रतिनिधी म्हणून मंत्रीमंडळात आहे. संघाने सरकारवर पाळत ठेवण्यासाठी दिलेला प्रतिनिधी आहे. तो म्हणजे सरकारातील पूर्ण संघ आहे. त्याचा राजीनामा म्हणजे संघाचे नाक कापल्यागत आहे. मोदी दुसऱ्या कुणाचाही राजीनामा घेऊ शकतो, पण प्रधानांचा राजीनामा संघाचे संमतीशिवाय घेऊ शकत नाही. संघाने ही जबाबदारी स्वीकारणे म्हणजे संघ भ्रष्ट असल्याचे संघाने मान्य करणे होय. तो तसा सर्वाधिक भ्रष्ट आहे. पण चांगुलपणाचा बुरखा घालून बसला आहे. सुब्रह्मण्यम स्वामी यांनी अटल बिहारी वाजपेयी यांचेवर केलेला आरोप आपण ऐकला आहे. काश्मिरच्या एका शिक्षकाची पत्नी अटल घेऊन गेला होता असा आरोप स्वामींनी केला. असे खूप सारे दडून आहे. म्हणून प्रधान यांचा राजीनामा घेणे या काळात फार महत्त्वाचे आहे. मोदी प्रधानाचा राजीनामा घेत नाही तर मुलांचा आक्रोश वाढतो. राजीनामा घेतो तर संघ खवळतो. दुसरीकडे एपस्टिन फाईलमुळे मोदींच्या चेहऱ्यावरचा नूर बदलला आहे. मोदीचा आत्मविश्वास कमी झाला आहे. इराणच्या युद्ध विजयाने मोदीची प्रतिमा आणखी खराब झाली. कारण मोदी इस्रायलला आपला पितृदेश म्हणतो. भारत मातृभूमी आणि इस्रायल पितृभूमी. मोदींनी बापाचे जागेवर नेत्यान्याहूचे नाव लावावे असे ते इस्रायल महान आहे. नरभक्षी म्हणून संघ - भाजप आणि इस्राएल सारखेच आहेत. हे सर्व लोक आता जाणून आहेत. म्हणून यांना सत्तेत राहण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यांना सत्तेतून हद्दपार करण्यासाठी देशव्यापी एकच आंदोलन केले पाहिजे.

‘भाजप हटाव - लोकशाही और देश बचाव’ मुलांना प्रधानाचा राजीनामा मागू द्या. जनतेनी मात्र भाजपचा राजीनामा मागावा. यासाठी तुमचे साऱ्यांचे पक्ष बाजूला असू द्या, आपले तत्वज्ञान, आपले आदर्श, आपला नेता असू द्या. तो सांभाळून ठेवा. तो सोडू नका. तो कुठेच जाणार नाही. पण आज एकाचे नेतृत्वात रस्त्यावरचे आंदोलन करा. कारण लोकशाही संपली आहे. देशात हुकूमशाही आली आहे हे बंगालमध्ये दिसून आले. लोकसभा विरोधी पक्षनेता हे पद सार्वजनिक आहे. जसे प्रधानमंत्रीपद सार्वजनिक आहे. म्हणून राहुल गांधींनी जी भूमिका घेतली ती पक्षीय नाही. ती राष्ट्रीय आहे. सरकारचा रस्त्यावर उतरून प्रतिकार केल्याशिवाय देश वाचणार नाही. होऊ द्या काही लोकांना शहीद. तसेही मारल्या जाणारच आहोत. थोडे आधी मारल्या जाऊ. पण हुकूमशाहीचा प्रतिरोध आज आवश्यक आहे. ज्या देशाचा गृहमंत्री तडीपार असतो त्या देशात बुलडोझर प्रतिक होणारच. माफिया राज जर देशात आले असेल तर हुकूमशाही येणारच. म्हणून लहान लहान पक्ष आणि त्यांचे मूठभर लोक जर युगो करत असतील तर हुकुमशाहीला पूरक वातावरण निर्माण करण्यात आपण मदत करीत आहोत. असे होता कामा नये. त्यात समजदारी नाही. आम्ही एकेकाळी बसपाचे नेतृत्वात काँग्रेस विरोध केला. कारण काँग्रेस पक्ष सत्तेत होता. आमच्यासाठी तोच शत्रू होता. सत्तेत असणाऱ्यांनाच प्रश्न विचारावे लागतात. त्यांचेच विरुद्ध जनतेच्या प्रश्नासाठी लढावे लागते.आम्ही बसपानी उत्तर प्रदेशात काँग्रेस जवळपास नष्ट केली. पण ती जागा बसपला घ्यायची होती. झाले उलट भाजप सत्तेत आली. त्याला आम्हीच जबाबदार आहोत. आम्ही भाजपची नीती समजू शकलो नाही. विधानसभेत ब्राम्हण बसपला मते द्यायची, पण लोकसभेत भाजपला मते द्यायची. हे जाणीवपूर्वक होत होते. अशात कांशीराम साहेबांचा संशयास्पद मृत्यू झाला. आज साहेब असते तर भाजप संघ हुकुमशाहीचे विरुद्ध लढ्याचे सेनापती असते.

चांगले होईल म्हणून आम्ही काँग्रेसला विरोध केला. भाजपला आणण्यासाठी काँग्रेसला विरोध केला नाही. या चुका सर्वांच्याच झाल्या. काँग्रेस, समाजवादी, जनता दल सर्वच चुकलोत. म्हणून तेच घोळत बसणार काय? समोरचे संकट ओळखा. हुकूमशाही आली. आता लोकशाही गेली. देश संकटात सापडला. आधी देश वाचवा. मग आपापले संघटन आणि पक्ष. त्यासाठी सर्वांनी लोकसभा विरोधी पक्ष नेता म्हणून राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर देशव्यापी जनआंदोलन करा. मी काँग्रेसचे नेतृत्वात म्हणत नाही. राहुल गांधी काँग्रेसचे नेते जरी असले तरी ते लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आहेत. या भूमिकेत सर्वांचा समन्वय होईल. तेव्हाच देश बचाव आंदोलन उभे राहील. त्यातच सर्वांचे आणि देशाचे भले आहे. आज भाजपचा अतिरेक लोकांचे समोर उघड झाला. तो अतिरेकच भाजपचा नाश करेल. ती वेळ आज आहे.●●

लेखांक160


अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

“ एखाद्याला दोष देताना, त्याच्या जागी स्वतःला ठेऊन पाहा... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# स्वाभिमानाच्या लढ्याचा महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**गुलामाला त्याच्या गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे तो बंड करून उठेल. हे वचन केवळ शब्द नव्हते, तर भारतीय समाजव्यवस्थेत शतकानुशतके दडपल्या गेलेल्या लाखो लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारी सामाजिक क्रांती होती. ही क्रांती घडवून आणणारे महामानव म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.**

भारतीय समाजाच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ एका समाजाचे नेतृत्व केले नाही, तर संपूर्ण देशाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा मार्ग दाखविला. त्यांच्या संघर्षामुळेच आज समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना शिक्षण, रोजगार, सन्मान आणि घटनात्मक अधिकार प्राप्त झाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या समाजाने केवळ नोकरीच्या मर्यादित चौकटीत न राहता शिक्षण, उद्योग, व्यापार, विज्ञान, संशोधन आणि प्रशासन या सर्व क्षेत्रांत आपला ठसा उमटवला पाहिजे. समाजातील बुद्धिमान तरुणांनी शासकीय आणि प्रशासकीय सेवांमध्ये स्थान मिळवावे, तर उद्यमशील युवकांनी व्यापार आणि उद्योग क्षेत्रात मोठी झेप घ्यावी. यासाठी पारशी समाजाचे उदाहरण प्रेरणादायी ठरते. संख्या अत्यल्प असूनही त्यांनी उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि समाजकारणाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले. समाजाची प्रगती केवळ लोकसंख्येवर अवलंबून नसते, तर दूरदृष्टी, शिक्षण आणि संघटनशक्तीवर अवलंबून असते. आज अनेक जण शिक्षण, नोकरी, उद्योग, प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान, तंत्रज्ञान, पत्रकारिता, कला, साहित्य आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. परंतु या यशामागे कोणाचा संघर्ष आहे, कोणाच्या त्यागामुळे हे शक्य झाले, याचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे. कारण इतिहास विसरणारा समाज आपले भविष्य घडवू शकत नाही. हजारो वर्षांच्या अन्यायाची पार्श्वभूमी भारतीय समाज व्यवस्थेत जातिव्यवस्थेने अनेक समाजघटकांना विशिष्ट व्यवसायांमध्ये जखडून ठेवले होते. जन्माला आलेली जात म्हणजे आयुष्यभराची ओळख आणि व्यवसाय निश्चित. शिक्षणाचा अधिकार नव्हता, संपत्ती मिळवण्याची संधी नव्हती, सन्मानाने जगण्याचा अधिकार नव्हता. महार समाज गावाबाहेर राहत होता. त्याला अस्पृश्य मानले जात होते. चांभार समाज कातडीच्या कामात अडकून पडला होता. मातंग समाजाला गावोगावी वाजंत्री आणि इतर कनिष्ठ समजली जाणारी कामे करावी लागत होती. कुंभार, लोहार, सुतार, धनगर, माळी, वडार, आदिवासी आणि इतर अनेक समाजघटकांना त्यांच्या पारंपरिक व्यवसायांच्या चौकटीबाहेर जाण्याची संधी नव्हती. प्रश्न हा नव्हता की हे व्यवसाय कनिष्ठ होते. कोणतेही श्रमाधारित काम कमी दर्जाचे नसते. प्रश्न होता तो निवडीच्या स्वातंत्र्याचा. एखाद्या व्यक्तीला डॉक्टर, वकील, शिक्षक, अधिकारी किंवा उद्योजक व्हायचे असेल, तरी त्याला ती संधी मिळत नव्हती. जन्मानेच त्याचे आयुष्य निश्चित केले जात होते.

**परिवर्तनाचा प्रारंभ :** १४ एप्रिल १८९१ रोजी डॉ. बाबासाहेबांचा जन्म झाला आणि भारतीय समाजाच्या इतिहासाला नवे वळण मिळाले. स्वतः अस्पृश्यतेच्या वेदना भोगलेल्या या महामानवाने शिक्षणाला परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र बनवले. कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्ससारख्या जगप्रसिद्ध संस्थांमधून उच्च शिक्षण घेऊन ते भारतात परतले. त्यांना स्वतःच्या वैयक्तिक प्रगतीत रमायचे नव्हते. त्यांना संपूर्ण समाजाची मुक्ती हवी होती. त्यांनी प्रश्न विचारला, ‘माणूस माणसापेक्षा कनिष्ठ कसा असू शकतो? जन्माच्या आधारावर अधिकार कसे ठरू शकतात? शिक्षण, पाणी, मंदिर, रोजगार आणि सन्मान यांवर काहींची मक्तेदारी का असावी?’ या प्रश्नांनी भारतीय समाजव्यवस्थेला हादरा दिला. महाड, सामाजिक क्रांतीचे केंद्र : महाड हे भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व आहे. १९२७ चा चवदार तळे सत्याग्रह हा केवळ पाण्याचा प्रश्न नव्हता; तो मानवी सन्मानाचा लढा होता. सार्वजनिक पाण्याच्या स्रोतांवर सर्वांचा समान हक्क आहे, हा संदेश डॉ. बाबासाहेबांनी जगाला दिला. नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन असो किंवा अस्पृश्यते विरोधातील संघर्ष, डॉ. बाबासाहेबांनी प्रत्येक लढ्यात मानवी प्रतिष्ठेचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला. त्यांनी समाजाला स्पष्ट सांगितले, दया नको, अधिकार हवेत; भीक नको, न्याय हवा.’ शिक्षणाचा महामंत्र, ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा डॉ. बाबासाहेबांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. पूर्वी अनेक समाजघटकांना शाळेच्या दारातही प्रवेश नव्हता. आज त्या समाजातील मुले डॉक्टर, अभियंते, न्यायाधीश, प्राध्यापक, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, पत्रकार आणि उद्योजक बनत आहेत. हे परिवर्तन अचानक घडले नाही. त्यामागे डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाच्या अधिकारासाठी केलेला संघर्ष आहे. आज एखादा दलित, आदिवासी किंवा मागासवर्गीय विद्यार्थी परदेशात जाऊन शिक्षण घेत असेल, संशोधन करत असेल किंवा जागतिक स्तरावरील संस्थांमध्ये नेतृत्व करत असेल, तर त्या यशामागे डॉ. बाबासाहेबांनी पेटवलेला ज्ञानाचा दिवा आहे. आरक्षण : दान नव्हे, सामाजिक न्यायण. राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाची जी संकल्पना मांडली, त्यात आरक्षण हा एक महत्त्वाचा घटक होता. आरक्षणाबाबत अनेक गैरसमज पसरवले जातात. काही लोक आरक्षणाला ‘फुकटची सवलत’ म्हणतात. परंतु आरक्षण ही दया नसून सामाजिक न्यायाची व्यवस्था आहे. हजारो वर्षे ज्यांना शिक्षणापासून, रोजगारापासून आणि सत्तेपासून दूर ठेवले गेले, त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही घटनात्मक तरतूद करण्यात आली. आरक्षणामुळे लाखो कुटुंबांचे जीवन बदलले. पहिल्या पिढीतील विद्यार्थी शिक्षित झाले. सरकारी सेवेत प्रवेश मिळाला. आर्थिक आणि सामाजिक उन्नतीची दारे खुली झाली. मात्र आरक्षण हे अंतिम ध्येय नव्हते. डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न ‘समाज निर्माण करण्याचे होते, जिथे कोणालाही जात, धर्म किंवा जन्मामुळे भेदभाव सहन करावा लागणार नाही.’



विलास गजभिये
मो. 9421588901



**भारतीय संविधान - आधुनिक भारताचा पाया :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे भारतीय संविधान. संविधान तयार करताना त्यांनी कोणत्याही प्रकारचा राग, द्वेष किंवा भेदभाव मनात ठेवला नाही. त्यांनी प्रत्येक भारतीय नागरिकाचा विचार केला. संविधानाने प्रत्येकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचे अधिकार दिले. अस्पृश्यतेला कायद्याने गुन्हा घोषित करण्यात आले. कायद्यापुढे सर्व समान आहेत, हे तत्त्व प्रस्थापित करण्यात आले. आज आपण मतदान करू शकतो, शिक्षण घेऊ शकतो, नोकरी करू शकतो, न्यायालयात जाऊ शकतो आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतो; यामागे संविधानाची ताकद आहे. संविधान केवळ कायद्याचा दस्तऐवज नाही, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. माणसाला माणूसपण देणारा विचार डॉ. बाबासाहेबांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी संपूर्ण मानवजातीसाठी समता आणि बंधुभावाचा संदेश दिला. त्यांनी स्त्रियांच्या अधिकारांसाठी लढा दिला. कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. शेतकरी, वंचित, दुर्बल आणि शोषित घटकांच्या न्यायासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांमध्ये द्वेष नव्हता; अन्यायाविरुद्ध संघर्ष होता. त्यांचा लढा कोणाविरुद्ध नव्हता, तर विषमतेविरुद्ध होता. आजची पिढी आणि डॉ. बाबासाहेब आज अनेक तरुण उच्च शिक्षित आहेत. मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत. परंतु त्यांना ही संधी कशी मिळाली, याचे स्मरण असणे आवश्यक आहे. जर डॉ. बाबासाहेब नसते, तर आजची सामाजिक परिस्थिती काय असती याची कल्पनाही करणे कठीण आहे. लाखो लोक शिक्षणापासून वंचित राहिले असते. अस्पृश्यता अधिक तीव्र स्वरूपात अस्तित्वात असती. समान संधींची संकल्पना समाजात रुजली नसती. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांचे स्मरण करणे म्हणजे केवळ जयंती साजरी करणे नव्हे; तर त्यांच्या विचारांचे आचरण करणे हे खरे स्मरण आहे. डॉ. बाबासाहेबांची आठवण का अमर आहे? एखाद्या व्यक्तीची आठवण तिच्या पदामुळे राहत नाही; ती तिच्या कार्यामुळे जिवंत राहते. डॉ. बाबासाहेबांनी कोट्यवधी लोकांना आत्मसन्मान दिला. शिक्षणाचा मार्ग दाखवला. संघर्षाची प्रेरणा दिली. समानतेची जाणीव निर्माण केली. लोकशाहीचा पाया मजबूत केला. म्हणूनच त्यांचे कार्य काळाच्या कसोटीवर टिकले आहे. सागराचे पाणी कधीतरी आटू शकते, पर्वत कोसळू शकतात, साम्राज्ये नष्ट होऊ शकतात; पण मानवमुक्तीचा संदेश देणाऱ्या डॉ. बाबासाहेबांची आठवण कधीच मिटू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते; ते आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी दडपलेल्या समाजाला आवाज दिला, गुलामगिरीची जाणीव करून दिली आणि माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला. आज आपण शिक्षण, नोकरी, प्रतिष्ठा आणि संविधानिक अधिकारांचा लाभ घेत आहोत, तर त्यामागे डॉ. बाबासाहेबांचा दूरदर्शी विचार, त्याग आणि संघर्ष आहे. म्हणूनच लाखो लोकांच्या भावना अशा शब्दांत व्यक्त होतात, ‘हाच जन्म काय, हजार जन्म झाले तरी डॉ. बाबासाहेबांवरील प्रेम, आदर आणि कृतज्ञता कधी कमी होणार नाही. कारण त्यांनी केवळ समाज बदलला नाही, तर माणसाला माणूसपण दिले.’ ●●

# झाडीची महिमा गाणारा काव्यसंग्रह म्हणजेच कानात सांग!

झाडी आणि झाडीशी एकरूप झालेले तसेच झाडीचे महर्षी म्हणून ओळखले जाणारे डॉ. हरिचंद्र बोरकर हे या साहित्य क्षेत्रातील अनेक नावात एक नावाजलेले नाव आहे. या महान योगदानाविषयी महर्षी डॉ. बोरकर यांच्या विषयी नेहमीच अभिमान वाटतो. महर्षी बोरकर यांचे झाडीबोली भाषेतील साहित्य असोत किंवा मराठी बोलीभाषेतील साहित्य वाचक वर्गांना दिशा देत असतात. प्रोत्साहन देत असतात, एवढेच नाही तर मार्गदर्शन करत असतात. म्हणून आजपर्यंत बोरकर यांच्या साहित्यावर अनेक लोकांनी पीएचडी केली आहे, त्यांचे साहित्य कोसो दूर पोहोचले आहेत ही झाडीमाईचा कदाचित बोरकर यांना मिळालेला आशीर्वाद असावा. त्यांचे अनेक साहित्य वाचनीय आहेत. सोबतच आजच्या व उद्या येणाऱ्या भावी पिढीसाठी दिशादर्शक आहेत. म्हणूनच आजही त्यांच्या प्रत्येक शब्दात एक वेगळा भाव असतो, आपुलकी असते, प्रेम असतो, वेदना असतात, जिव्हाळा असतो. एवढेच नाही तर निसर्गाला सुद्धा गहिवरून सोडतात. या वयातसुद्धा बोरकर साहित्यसेवेत व्यस्त राहतात. ही त्यांच्यात असलेली साहित्याची ओढ आहे आणि झाडीबोली भाषेशी त्यांचे असलेले प्रेम हे समाजाला दिसत आहे. नुकताच आता त्यांच्या कानात सांग या कवितासंग्रहावर अनेक लेखकांच्या, लेखिकांच्या त्यांच्या कवितांवर रसग्रहणाचे पुस्तक निघत आहे. त्याबद्दल बोरकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन! तसेच अनेक शुभेच्छा देते. मला सुद्धा या मौल्यवान शब्दात लिहिलेल्या कवितांवर रसग्रहण करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजते. वास्तविक पाहता मी तेवढी मोठी नाहीच. तरीपण हे भाग्य लाभले यात मला विशेष आनंद होत आहे. हा रसग्रहणाचा पुस्तक विशेष ग्रंथ म्हणून ओळखला जाईल. कारण या सर्वच कविता अस्सल झाडीबोली भाषेत लिहिलेल्या आहेत हे फार विशेष आहे. या काव्यसंग्रहात अनेक कविता वाचनीय आहेत. त्यात बोरकरांनी लिहिलेली खोवाड ही कविता मला भावली आहे त्यातील काही ओळी लिहीत आहे. ‘खोवाड वानी पल्ला, घर हा भरून गेला झाला तरा घराचा, सप्पा गरून गेला येयेल अज उद्या, आता घडी कई तो धुवून वाट याची डोरा गरून गेला खोवाड हे खऱ्या अर्थाने जंगलात असते. जसे खोल आणि खूप मोठे असलेले जसे की, पत्तासिजनच्या वेळेस पाने तोडण्यासाठी जंगलात जातात आणि कोणी म्हणतात की, अगा भाऊ आम्ही या खोवाडाकडे आहोत, इकडे ये! पाने तोडण्यासाठी असेच जेव्हा हेच खोवाड पाण्यानी भरते, तेव्हा अगदी बघण्यासारखा दिसतो. पण, साहित्यिकांनी खोवाडाचे फक्त उदाहरण दिले आहे. खास करून जेव्हा मुसळधार पावसाने घर बदाबदा गळत असतो तेव्हा, घराची स्थिती कशी असते. फक्त त्या घरमालकाला माहित असते. जसे अख्खे खोवाड भरल्यासारखे घर जेव्हा पाण्याने भरले बघून डोळे भरून येतात ती परिस्थिती माणसाला रडायला भाग पाडते. त्यावेळी घरातील जिवनाआवश्यक सामान त्या पाण्याने भरलेल्या खोवाडात सामील झालेले असते. गरीबाच्या घराची स्थिती ही पावसामुळे त्या खोवाडासारखी दिसते. साहित्यिक बोरकरांनी त्या घराची स्थिती आपल्या लेखणीच्या माध्यमातून वास्तव दर्शन घडवून दिले आहे. अगदी मनाला भावणाऱ्या कविता आणि त्यातील शब्द जणू वाचतच रहावे वाटते. लिखाणाची शैली आणि असलेला शब्द भंडार आज महर्षी बोरकरांकडे आहे. एकसे एक उत्तम रचना या झाडीमायेचा गौरव वाढवतात. त्यातील एक कविता ‘उद्या दिवारी’ या शीर्षकावर आधारित असलेली संपूर्ण गावखेड्याचा वर्णन करते. एवढेच नाही तर तेथील संस्कृतीचे प्रामुख्याने दर्शन घडवून आणते त्यातील मी दोन ओळी लिहीत आहे. झाली गावात मुनादी,उद्या दिवारी, दिवारी पोरा भुकेजलं बाई, नसं दाना येक बाई धान लहऱ्या मारते, जोराजोराना वावरी, पर आये रित सये, माजी धानाची बकारी’. या कवितेतून महर्षी बोरकर यांनी शेतकऱ्यांची व्यथा लिहिली आहे. गावखेड्यात गेल्या काही वर्षाआधी बांबूने विनलेले ढोल्या असायच्या किंवा घरातच धानाची ठिकी असायची. जास्त धान असले की ते ठेवण्यासाठी धाब्यावर मातीने बनवलेले बकाऱ्या दिसत असत. पण, आजकाल शेतकरी वर्ग धान शेतातच चुरत असतात आणि तेथूनच विकायला नेत असतात. त्यामुळे बकारी व ढोल्या कशा असतात आजकालच्या पिढीला माहीत नाही. अशीच एक शेतकरी महिलेची व्यथा यातून दिसते. अवकाळी पाऊस तसेच धानाला लागलेली रोगराई तसेच पाहिजे तेवढ्या प्रमाणात धान होत नाही आणि समोर दिवाळीचा सण असतो. पण,घरच्या बकाऱ्याच रित्या, खाली आहेत तर हातात पैसे कुठून येणार? मग दिवाळीचा सण साजरा कसा करायचा या विचारात ती, शेतकरी महिला दुःख व्यक्त करत असते. मुलांना नवीन कपडे कुठून घ्यायचे, गोड खाऊ कसे बनवायचे हा प्रश्न तिच्या डोळ्यासमोर असते म्हणून म्हणते यंदा दिवाळीचा सण तरी कसा साजरा करू? माझ्या धाब्यावरच्या बकाऱ्या तर खाली आहेत. अगदी वास्तव परिस्थिती या कवितेतून दिसून येते. कवितेशी एकरूप होणे आणि कवितेला समर्पित होणे हे प्रत्येकाला जमत नाही. जो कविता मनातून लिहितो आणि त्या प्रमाणेच जगत असतो त्याला स्वतःची ओळख करण्याची गरज पडत नाही. महर्षी बोरकर सुद्धा झाडीबोली भाषेतील कवितेला समर्पित झाले आहेत. म्हणून त्यांच्या सर्वच कविता लोकप्रिय झालेले आहेत. त्यातील मला आवडलेली कविता ‘कानात सांग’ या शीर्षकावर आधारित आहे. हा विषय कोणाच्या परिचयाचा नसेल असे मुळीच नाही. लहान मुले तर आजोबाला कानात जाऊन सांगत असतात. चला तर मग ही कानात सांग कविता का म्हणते यातील दोन ओळी लिहीत आहे. ‘झालीना भरला सोना, मोवाच्या झाडाखाली कानात सांग परसाच्या, घात फुलांची आली येरूनी लागली झुरनी, फुगल्या पाहुनी बोरी, लावली गऱ्याच्या खाली गात फुलांची आली’ महर्षी बोरकर यांनी झाडांचे, फुलांचे, फळांचे गुणगौरव करताना मागे राहिले नाही. अगदी पळसाच्या कानात गोष्ट सांग म्हणतो. म्हणजेच पळस सुद्धा कशातच कमी नाही बरे, अगदी निसर्गाने वर्णन करताना व त्यांचे बोलणे, सांगणे, त्यांचा चालत असलेला संवादसुद्धा शिकायला भाग पाडतो. झाडे बोलत नाही असे सर्वांना वाटते. पण, तसे नसते. त्यांची भाषा आणि त्यांचा चालत असलेला संवाद फक्त एक कवी आपल्या कल्पनाशक्तीतून करत असतो व लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवत असतो. काही गोष्ट महत्वाची असेल तर ये, जरा माझ्या कानात सांग म्हणतात. म्हणजेच कानात सांगितलेले विशेष असतोच की, बसं तेथे असलेल्या झाडांफुलांचे संवाद सुद्धा आपुलकीचे महर्षी बोरकर यांनी कवितेतून लिहिले आहेत. फारच सुंदर वर्णन आणि मनाला भावणाऱ्या सर्वच कविता आहेत अगदी वाचतच रहावे वाटते. या कवितासंग्रहावर अनेक कवी रसग्रहण करत आहेत हीच तर खरी मिळकत बोरकरांना मिळालेली आहे. आपल्या आयुष्यात त्यांनी झाडीबोली भाषेवर जिवापाड प्रेम केले आणि तिची साता समुद्रापार ओळख करून दिली ही सर्वात मोठी सेवा महर्षी बोरकर यांच्या हाताने झाले. या साहित्य वारीत मला सुद्धा महर्षी बोरकर यांच्यासोबत अनेकदा बोलण्याचा आणि भेटण्याचा योग आला. सोबतच मला त्यांच्याकडून अनेकदा मार्गदर्शन लाभले हेच माझ्यासाठी खूप काही आहे. पुनःश्च एकदा या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्त मा. बोरकरांना हार्दिक शुभेच्छा देते व त्यांना दीर्घ आयुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करते.●●





रसग्रहण



संगीता संतोष ठलाल
7821816485

# पदवी



तीव्र त्याच्या परत येण्याची आतुरतेने वाट बघत होती. आनंद आणि अधीरता या दोन्ही संमिश्र भावना तिच्या मनात होत्या. मागच्या चार वर्षाचा काळ आठवत उगीच ती वेळ घालवण्यासाठी काही तरी करीत होती. पण, पूर्ण लक्ष दाराच्या बेलकडे लागले होते. त्याच्या येण्याची वेळ तिला ठाऊक होती. उगीच तिला वाटत होते घडी सावकाश चालत आहे. या भावनांच्या कल्लोळात तिने दाराची बेल वाजल्याचा आवाज ऐकला. लगबगीने उठली. दार उघडले. तो घरात पाऊल ठेवताच दार बंद केले आणि त्याला बिलगली. तो क्षणभर घाबरला. दुसऱ्या क्षणात सावरला. 'अरे,अचानक काय झाले? काही...' त्याचे वाक्य मधेच तोडत ती बोलली, 'रिझल्ट आला.' 'अरे वा..काय झाले?' 'मी पास झाले.' तिने स्मित करून उत्तर दिले. तिच्या डोळ्याच्या कडा पाणावल्याचे त्याच्या लक्षात आले. तिचा हात धरून खुर्चीवर बसवले. हस्तांदोलन करण्यासाठी हात पुढे करीत बोलला, 'अभिनंदन. मला आधीच का नाही कळवले' तिने त्याचा हात हातात घेऊन 'थँक्स' म्हणून पुढे बोलली, 'हे तुमचे यश आहे आणि तुम्ही घरी आल्यावरच सांगायचे ठरवले होते.' तो खळखळून हसला 'माझे यश? अग श्रम तुझे, अभ्यास तू केलास, परीक्षा तू दिलीस. उगाच श्रेय मला.' 'तुमचा स्वभाव मी जाणते. चार वर्षे झालीत लग्नाला. लग्नाआधी मी काय तर बारावा वर्ग पास होते. इथे आले आणि तुम्ही मागे लागून शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. पूर्ण मदत केली म्हणून तर मी पदवीपर्यंत शिकू शकले.' तुला आठवते सगळे. 'हो, ते कसे विसरेन?' ती हलक्या स्वरात उत्तरली. दोघेही ग्रामीण भागातून आले होते. तो कॉमर्स कॉलेज मध्ये पदवी शिक्षण घेण्यासाठी शहरात दाखल झाला होता. आर्थिक स्थितीनुसार भाड्याची खोली करून राहत होता. स्वतःचे काम करण्याची त्याची ही घराबाहेर पडल्याने पहिलीच वेळ होती. पण जिद्द होती. घरमालकही प्रेमळ होता. कॉलेज सकाळचे असल्याने काम शोधले. चार पाच तासाचे काम मिळाल्यावर त्याला एक आधार प्राप्त झाला होता. गावाकडची आर्थिक स्थिती बेतास बात अशी. पण शिकण्याची जिद्द स्वस्थ बसू देत नव्हती. आई वडिलांनीही अडंगा केला नाही. जमेल तसे मदत करीत होते. काम मिळाल्याने आत्मविश्वास दुणावला होता. पदवी मिळाल्यावर त्याने स्पर्धा परीक्षांची तयारी सुरु केली. त्याचबरोबर एखाद्या फर्ममध्येही काम शोधत होता. अनुभव गाठीशी असल्याने एका सनदी लेखापाल फर्ममध्ये काम मिळाले. थोडा पैसा बरा हाती येत होता. कामाची वेळ संपल्यावर बाहेरच्या एक दोन सहकारी संस्थांचे अकाउंट तो मेन्टेन करून देत असल्याने पैसा मिळत होता. श्रम पडत होते. घरच सांभाळून हे सर्व करीत असल्याने त्याला त्रास व्हायचा पण ध्येय निश्चित असल्याने या बाबी त्याच्यासाठी दुय्यम ठरल्या. आईवडील कधी यायचे. त्याची धावपळ बघायचे. तो आता पंचविशीत आला होता. एक दिवस वडील म्हणाले, 'ही तुझी धावपळ, अवेळी जेवण, नाही बघवत. आता तू लग्न करून घे. तेवढी तुला मदत होईल. आराम मिळेल.' त्याच्या चेहऱ्यावर हलके स्मित उमटले. 'ठीक आहे.' तो एवढेच बोलला. आईवडील गावाकडे परत आले. मुलगी शोधण्याच्या कामात लागले. ग्रामीण भागातीलच काही मुली दहावी बारावी शिकलेल्या लक्षात आल्यावर त्याला बोलावून घेतले. त्याला ही बारावी झालेली मुलगी पसंत पडली होती. लग्न आटोपून दोघेही शहरात आले. दरम्यान तीन खोल्यांचे घर त्याने भाड्याने घेतले होते. नोकरीत मिळालेल्या सुट्ट्या संपायच्या दोन दिवस आधी ते घरात दाखल झाले. थोडे आवश्यक तेवढे सामान होते. काही त्याचे तर काही लग्नात भेट आलेले. दोघात नवीन असल्याने थोड अवघडलेपण होते. संवादातून ते दूर होत गेले. सायंकाळी जेवणाच्या वेळी त्याने थेट विचारले, 'पुढे काय करायचे ठरवले आहे.' त्याच्या या प्रश्नावर ती भांबावली, 'म्हणजे..?' 'तू बारावा वर्ग पास आहेस. किती टक्के मार्क्स होते?' त्याने पुन्हा प्रश्न केला. 'पंचेचाळीस..' तिने हळू आवाजात उत्तर दिले. 'तुझे मार्क्स बरे आहेत. इथे घरी बसून तू काय करशील. त्यापेक्षा तू कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा असे मला वाटते.' तो बोलून गेला. 'मला बारावी होऊन दोन वर्ष झालीत.' तिने शंका व्यक्त केली. 'त्याला काय होते, तू मनाची तयारी कर. आपण गावाकडे जाऊ. आवश्यक ती सर्व कागदपत्र घेऊन येऊ. तुझा प्रवेश निश्चित करू.' तो एका दमात बोलून गेला. ती क्षणभर घाबरली. मनातून मात्र सुखावली. काही दिवसांनी दोघेही गावाकडे आले. त्याने आवश्यक ती सर्व कागदपत्रे गोळा करून तिची ॲडमिशन करूनच तो थांबला. कॉलेजात ती नियमित होती. अभ्यासही करायची. अडले तर त्याची मदत घ्यायची. तो पण तिच्या अभ्यासाच्या वेळेत आपली बाहेरची काम घरी आणून सोबत करायचा. त्याचा एकत्रित परिणाम आज लागलेला निकाल. 'आता पुढे काय करायचे ठरवले आहेस?' त्याच्या या प्रश्नावर ती हसून उत्तरली 'तुम्ही म्हणाल तसे..' दोघेही एक दुसऱ्याकडे पाहून हसले. तोच विषय बदलवत बोलून गेला 'ते नंतर ठरवू. आज मात्र तू पदवीधर झाल्याचा आनंद लुटू. चल तयारीला लाग, बाहेर जाऊ या.' आणि दोघेही हसतच तयारीला लागले.●●



अनिरुद्ध कांबळे
मो.9922959770

# 'रेखा' : एका संविधाननिष्ठ आयएएस अधिकाऱ्याच्या यशामागील प्रेरणादायी जीवनगाथा

दि. १३ जून २०२६ रोजी नागपूर येथे ई. झेड. खोब्रागडे संविधान ट्रस्टतर्फे आयोजित ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान सन्मान सोहळा’ मोठ्या उत्साहात पार पडला. देशभरातील २० संविधाननिष्ठ व्यक्तींचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. कार्यक्रमानंतर पुस्तक प्रदर्शनात माझ्या हाती ‘रेखा’ हे पुस्तक आले. लेखक होते माजी आयएएस अधिकारी मा. ई. झेड. खोब्रागडे. एका बैठकीत हे पुस्तक वाचून पूर्ण केले आणि मन अक्षरशः भारावून गेले. हे पुस्तक केवळ एका पत्नीचे चरित्र नाही; तर एका प्रामाणिक सनदी अधिकाऱ्याच्या यशामागे उभ्या असलेल्या स्त्रीशक्तीचा, आंबेडकरी संस्कारांचा आणि संविधाननिष्ठ जीवनमूल्यांचा प्रेरणादायी दस्तऐवज आहे. सन २०१५ मध्ये ‘भारताचे संविधान - प्रास्ताविका’ या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर लेखकांच्या मनात एक विचार आला, संविधानाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणाऱ्या आपल्या पत्नी रेखा यांच्यावरही पुस्तक लिहिले पाहिजे. त्या विचारातूनच ‘रेखा’ या पुस्तकाचा जन्म झाला. ई. झेड. खोब्रागडे यांचा जन्म अत्यंत गरीब कुटुंबात झाला. आई-वडील निरक्षर असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होते. वडिलांनी मुलाच्या मनात एकच स्वप्न रुजवले, ‘कलेक्टर व्हायचे.’ आर्थिक अडचणी, शिक्षणासाठीचा संघर्ष, नोकरी आणि अभ्यास यांचा समतोल साधत त्यांनी स्वतःचा मार्ग तयार केला. याच काळात रेखा यांची साथ त्यांच्या आयुष्यात आली. सुशिक्षित, सुसंस्कृत आणि विचारांनी समृद्ध असलेल्या रेखा यांनी केवळ पत्नी म्हणून नव्हे, तर प्रत्येक टप्प्यावर प्रेरणादायी सहप्रवासी म्हणून त्यांची साथ दिली. दोघांचा विवाह २४ फेब्रुवारी १९८० रोजी झाला आणि त्यानंतर संघर्षाला नवी दिशा मिळाली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवून ते उपजिल्हाधिकारी झाले. पुढे विविध जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कामगिरी केली. वर्धा, गडचिरोली, अहेरी, चंद्रपूरसह अनेक ठिकाणी त्यांनी प्रामाणिक आणि लोकाभिमुख अधिकारी म्हणून काम केले. आदिवासी विकास, प्रशासनातील पारदर्शकता आणि जनहिताची भूमिका यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. पुस्तकातील सर्वात प्रेरणादायी भाग म्हणजे रेखा यांनी पतीकडून घेतलेली तीन वचने. पहिले, आयुष्यात कधीही भ्रष्टाचार करायचा नाही. दुसरे, भगवान बुद्धांच्या पंचशीलाचे प्रामाणिक पालन करायचे. तिसरे, पगाराशिवाय एक रुपयाही घरात आणायचा नाही. या तीन तत्त्वांवर उभा राहिलेला संसारच पुढे एका आदर्श प्रशासकीय कारकिर्दीचा पाया ठरला. लेखकांनी एका प्रसंगाचे वर्णन केले आहे. एका व्यक्तीने त्यांना लाच देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी ती स्पष्ट शब्दांत नाकारली आणि ‘मी पैसे खात नाही; उलट गरिबांचे काम प्रामाणिकपणे करतो,’ असे सांगितले. हा प्रसंग त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीचा आरसा ठरतो. निवृत्तीनंतरही त्यांची समाजसेवा थांबली नाही. संविधान जनजागृती, संविधान फाउंडेशनची स्थापना, नागपूरमधील संविधान चौक, शाळांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन, २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा करण्यासाठी सातत्याने केलेले प्रयत्न ही त्यांची मोठी सामाजिक देणगी आहे. २००५ मध्ये नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना त्यांनी शाळांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे नियमित वाचन सुरू केले. पुढे ही चळवळ महाराष्ट्रातून देशभर पोहोचली. या पुस्तकाचा सर्वात मोठा संदेश म्हणजे यशामागील स्त्रीचा सन्मान. लेखक शेवटी अत्यंत हृदयस्पर्शी आवाहन करतात, ‘मी माझ्या पत्नीवर पुस्तक लिहिले; प्रत्येकाने आपल्या पत्नीच्या योगदानाची नोंद घ्यावी.’ हा संदेश केवळ वैयक्तिक नाही; तो समता, कृतज्ञता आणि आंबेडकरी संस्कृतीचा मूलभूत विचार आहे. ‘रेखा’ हे पुस्तक एका अधिकाऱ्याच्या आत्मकथनापेक्षा अधिक आहे. ते प्रामाणिक प्रशासन, संविधाननिष्ठ जीवन, बौद्ध पंचशील, कौटुंबिक मूल्ये आणि स्त्री-पुरुष समतेचा जीवनधडा आहे. प्रशासकीय सेवेत जाणाऱ्या युवकांनी, सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्यांनी आणि प्रत्येक कुटुंबाने हे पुस्तक आवर्जून वाचावे. आजच्या भ्रष्टाचार, स्वार्थ आणि मूल्यहीन स्पर्धेच्या काळात ‘रेखा’ हे पुस्तक आशेचा किरण ठरते. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि संविधानाशी असलेली निष्ठा यांची सांगड घालणारे हे पुस्तक प्रत्येक वाचकाला अंतर्मुख करते. एका महान अधिकाऱ्याच्या यशामागे उभ्या असलेल्या एका महान स्त्रीचा हा गौरवग्रंथ आहे. त्यामुळे ‘रेखा’ हे पुस्तक केवळ वाचण्यासारखे नाही, तर प्रत्येक घरात जतन करून ठेवण्यासारखे प्रेरणादायी साहित्य आहे.●●



सुकुशल य ना पाटील
मो. 7499188 523





# स्मृती डॉ. सुधीर भगत यांच्या; साक्षी ‘स्वच्छंद’च्या प्रवासाची

पाली भाषेचे प्रखर पुरस्कर्ते, कुशल प्रशासकीय अधिकारी, बौद्ध साहित्य-संस्कृतीचे अभ्यासक आणि आंबेडकरी चळवळीचे प्रभावी लेखक, गीतकार व गायक डॉ. सुधीर भगत यांच्या निधनाची दुःखद वार्ता रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी सोशल मीडियावर पसरताच साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात शोककळा पसरली. त्यांच्या लेखनातील वैचारिक स्पष्टता, गीतांतील आशयघन शब्दरचना आणि प्रभावी गायनामुळे त्यांनी अनेकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनाने एका अभ्यासू साहित्यिकाची आणि समर्पित विचारवंताची पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या साहित्याचा परिचय झाल्यानंतर माझ्या ‘स्वच्छंद’ भाग ४ (बुद्ध-भीम गीते) या पुस्तकाची प्रस्तावना त्यांच्याकडून लिहून घ्यावी, अशी सूचना दैनिक बहुजन सौरभचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी केली. त्यानुसार त्यांच्या निवासस्थानी जाऊन प्रस्तावनेची विनंती केली. यापूर्वी बहुजन सौरभच्या कार्यालयात झालेल्या एका कार्यक्रमात त्यांच्याशी अल्पशी ओळख झाली होती. त्या पहिल्याच भेटीत त्यांचे साधेपण, अभ्यासू वृत्ती आणि साहित्यावरील निष्ठा मनाला भावली होती. माझी विनंती त्यांनी अत्यंत आत्मियतेने स्वीकारली आणि अल्पावधीतच पुस्तकासाठी अभ्यासपूर्ण, समर्पक व आशयपूर्ण प्रस्तावना लिहून दिली. माझ्या गीतांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांनी केलेले विश्लेषण पुस्तकाला नवे मूल्य प्राप्त करून देणारे ठरले. अनेक वाचकांनी प्रस्तावनेचे विशेष कौतुक करत दूरध्वनीवरून समाधान व्यक्त केले. हा अनुभव माझ्या साहित्यप्रवासातील अत्यंत संस्मरणीय ठेवा आहे. त्यांच्या पवित्र स्मृतींसमोर आज मी कृतज्ञतेने मस्तक झुकवून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. विजयादशमीच्या पावन पर्वावर दरवर्षी गीतमालेचा नवा संग्रह प्रकाशित करून साहित्यप्रेमींना भेट द्यावी, अशी माझी दीर्घकालीन इच्छा होती. मात्र विविध अपरिहार्य कारणांमुळे तो संकल्प पूर्ण होऊ शकला नाही. आयुष्यातील प्रत्येक इच्छा योग्य वेळ आणि परिस्थितीची साथ लाभल्यावरच साकार होते, याची पुन्हा एकदा जाणीव झाली. माझ्या सुवर्ण लग्नबंधनाच्या निमित्ताने ‘स्वच्छंद’ भाग ५ (भीम-बुद्ध गीते) प्रकाशित करण्याचा योग आला. पन्नास वर्षांचा सहजीवनाचा प्रवास हा केवळ आनंदाचा नसून संयम, समर्पण, परस्पर विश्वास आणि संघर्ष यांचीही कसोटी असतो. आरोग्याच्या कारणांमुळे २०२५ मध्ये प्रकाशन शक्य झाले नाही. मात्र २५ मे २०२६ रोजी लग्नबंधनाच्या ५१व्या वर्षात हा संकल्प पूर्णत्वास नेण्याचा आनंद लाभला. या पुस्तकाचे प्रकाशन भंते नागदीपांकर यांच्या हस्ते साध्या आणि कौटुंबिक वातावरणात संपन्न झाले. परिवर्तन विचार मंचचे कोषाध्यक्ष भीमराव गायकवाड, प्रीती तिरपुडे, ज्योत्स्ना बन्सोड आणि सेवानिवृत्त आयकर अधिकारी विजय आनदेव यांची उपस्थिती लाभली. पुस्तकाची प्रस्तावना बहुजन सौरभचे स्तंभलेखक श्रीराम बन्सोड यांनी लिहिली. संचालन प्रीती तिरपुडे यांनी तर आभार प्रदर्शन ज्योत्स्ना बन्सोड यांनी केले. यानंतर माझ्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ‘स्वच्छंद’ भाग ६ (गझल : हिंदी-मराठी) या पुस्तकाचे प्रकाशन बेसा रोड येथील रेड चिलीज हॉटेलमध्ये आयोजित समारंभात झाले. रसिक रंजन कला मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. केशव झिंझर्डे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, गझलकार व समीक्षक प्रा. हृदय चक्रधर उपस्थित होते. या संग्रहाची प्रस्तावना प्रा. चक्रधर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण लेखणीतून लिहिली. मनोगतात त्यांनी गझलसंग्रहाचे साहित्यिक मूल्य उलगडून सांगितले. कार्यक्रमात त्यांच्या काही निवडक हिंदी व मराठी गझलांच्या सादरीकरणाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे संचालन विलास गजभिये यांनी केले, तर प्रा. भीमराव गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. हे दोन्ही प्रकाशन सोहळे साधेपणा, आत्मियता आणि साहित्यप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विशेष संस्मरणीय ठरले. या प्रवासात अनेक ज्येष्ठ साहित्यिक, मित्र आणि सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यामध्ये डॉ. सुधीर भगत यांचे योगदान माझ्यासाठी सदैव प्रेरणादायी राहील. त्यांनी दिलेला प्रोत्साहनाचा हात, अभ्यासपूर्ण मार्गदर्शन आणि साहित्याविषयीची निष्ठा माझ्या लेखन प्रवासाला नवी दिशा देणारी ठरली. आज ते आपल्यात नसले तरी त्यांच्या लेखणीतील विचार, गीतांतील संदेश आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्रोत राहील. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन! ●●



रमेश गजभिये
मो. 9422304611

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १८०

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा विहितगाव नाशिक




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेकदा नाशिक जिल्हा दौरा केला असून नाशिकचा स्वतंत्र इतिहास आहे. नाशिक हे शहर आंबेडकरी चळवळीतील पुरातन काळापासून केंद्र आलेले आहेत. या ठिकाणी डॉ. बाबासाहेबांनी काळाराम मंदिराचे खूप मोठे आंदोलन केले होते. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने भारावलेले हे शहर आहे. नाशिक रोड स्टेशनजवळ विहित गाव आहे. या परिसरात विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

संवाद मित्र
कपिल नारनवरे
9370773608

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चित्रमय चरित्रातील प्रतिज्ञेबाबत खुलाशाची मागणी

## अभ्यासक हरिश्चंद्र लाडे यांचे शासनाला आवाहन



**गोंदिया :** महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चित्रमय चरित्र (फोटो बायोग्राफी) या सुधारित आवृत्तीतील २२ व्या खंडामधील एका प्रतिज्ञेबाबत प्रश्न उपस्थित करत प्रबोधनकार व आंबेडकर विचारांचे अभ्यासक हरिश्चंद्र लाडे यांनी शासन आणि संपादक मंडळाकडे खुलाशाची मागणी केली आहे. लाडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आतापर्यंत २२ हून अधिक खंड प्रकाशित करून महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. मात्र, २२ व्या खंडातील पान क्रमांक ३३६ वर प्रकाशित करण्यात आलेल्या धर्मदीक्षा प्रतिज्ञांपैकी एका प्रतिज्ञेच्या प्रामाणिकतेबाबत गंभीर शंका निर्माण होत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, या खंडात डॉ. बाबासाहेबांच्या हस्ताक्षरात चार प्रतिज्ञा प्रकाशित करण्यात आल्या असून त्यातील चौथी प्रतिज्ञा - 'मी विठ्ठल रखुमाई यांना देव मानणार नाही. अगर त्यांची उपासना करणार नाही' ही आजवर उपलब्ध असलेल्या अधिकृत २२ प्रतिज्ञांमध्ये आढळत नसल्याचा त्यांचा दावा आहे. लाडे यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, या प्रतिज्ञेचा मूळ स्रोत काय आहे? ती संपादक मंडळाला कुठून प्राप्त झाली? तसेच डॉ. बाबासाहेबांच्या मूळ हस्तलिखितात असा मजकूर असल्याचा कोणता अधिकृत पुरावा उपलब्ध आहे का, याची माहिती सार्वजनिक करावी. त्यांनी असेही नमूद केले की, या खंडाचे मुख्य संपादक प्रा. अविनाश डोळस यांच्यासह सहा सदस्यांचे संपादक मंडळ असून, त्यांनी या संदर्भात सविस्तर खुलासा करणे आवश्यक आहे. तसेच केवळ चार प्रतिज्ञा प्रकाशित करण्याऐवजी सर्व २२ प्रतिज्ञा अधिकृत स्वरूपात प्रकाशित कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. हरिश्चंद्र लाडे यांनी शासनाला या प्रकरणाची दखल घेऊन संपादक मंडळाकडून लेखी स्पष्टीकरण मागवावे तसेच आवश्यक असल्यास सुधारित आवृत्ती प्रकाशित करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या विषयामुळे आंबेडकरी समाजातील अभ्यासक आणि संशोधकांमध्ये चर्चा सुरू झाली असून, संबंधित संपादक मंडळ किंवा महाराष्ट्र शासनाकडून अधिकृत भूमिका काय मांडली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

# ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक स्मृतीशेष डॉ. सुधीर भगत यांचे बुद्धा टेकडीवर पर्यावरण पूरक अस्थी विसर्जन

## रूढी आणि परंपरेला फाटा देत वैज्ञानिक पद्धतीने पार पडले नागपूरला अंत्यसंस्कार



**वर्धा :** ज्येष्ठ आंबेडकरी साहित्यिक, लेखक, संपादक, 'ज्ञानसूर्य इस जगत का भिमराव महान गीतांचे गीतकार, गायक, संगीतकार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे माजी सेवानिवृत्त अधिकारी, धम्म चळवळीला आयुष्यभर वाहून घेणारे धम्मसेवक, पाली भाषेच्या संवर्धनासाठी शेवटपर्यंत लढणारा योद्धा म्हणून ज्यांची महाराष्ट्राला ओळख होती. असे डॉ. सुधीर वत्सला जनार्धन भगत यांचे दीर्घ आजाराने नागपूरला निधन झाले. अंत्यसंस्कार त्यांच्या नागपूरमधील निवासस्थानावरून रूढी आणि परंपरेला फाटा देत वैज्ञानिक पद्धतीने पार पडले. अंत्यसंस्कार नागपूरला पार पडल्यानंतर मृत्युपश्चात कोणतेही कर्मकांड न करण्याचा निर्णय भगत परिवारांनी घेतला. अस्थि विसर्जन कोणत्याही वाहत्या पाण्यात न करता सिंदी (मेघे) येथील बुद्ध टेकडीवर पर्यावरण पूरक अस्थि विसर्जन करण्याचा निर्णय स्मृतीशेष डॉ. सुधीर भगत यांची सहचारिणी सोनाली, मुलगा विक्रांत, सून निकिता, मुलगी भावना वाघमारे, जावई आनंद वाघमारे, लहान भाऊ दिनेश भगत, भावसून शुभांगी भगत, बहिण सरिता पखाले, बहिण शितल कांबळे, बहिणजावई डॉ. महेंद्र पखाले, बहिणजावई नितीन कांबळे इत्यादी परिवारातील सदस्यांनी घेतला. दि. 16 जूनला बुद्धा टेकडीवर पाच खड्ड्यामध्ये राख व अस्थि विसर्जित करून त्यावर बोधिवृक्ष (पिंपळ) आंबा, कडूनिंब, जांभूळ, उंबर वृक्षाचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी भगत परिवाराकडून बुद्धा टेकडीच्या पर्यावरणाच्या विकासाकरता 8500 धम्मदान देण्यात आले. या बुद्धा टेकडीवर आदरांजली सभा घेण्यात आली. आदरांजली सभेचे संचालन बुद्धा टेकडी मित्रपरिवाराचे सदस्य सुनील ढाले यांनी प्रास्ताविक प्रकाश कांबळे यांनी बुद्ध वंदना समाजभूषण पुरस्कार प्राप्त राजू थुल यांनी मनोगत प्रा. ज्ञानेंद्र मुंनेश्वर यांनी तर आभार रमाई फाउंडेशनचे अध्यक्ष दिनेश भगत यांनी मानले. यावेळी बुद्धा टेकडी मित्र परिवाराचे सदस्य प्रभाकर भगत, प्राचार्य मुन्ना नाखले, मुख्याध्यापक मुकुंद नाखले, दिनेश वाणी, प्रवीण जंगले, गौतम फुलमाळी सामाजिक कार्यकर्ते धर्मपाल ताकसांडे, माजी न्यायाधीश देवराव कांबळे, भास्कर भगत, राजाभाऊ ढाले, रमाई फाउंडेशनचे सदस्य व मोठ्या संख्येने धम्म बांधव उपस्थित होते.

## महत्वाचे

### माजी आमदार बी. टी. देशमुख यांच्या निधनाने सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी



**अकोला :** पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार बी. टी. (बीटीभाऊ) देशमुख यांच्या निधनाने सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील एक अभ्यासू, सुसंस्कृत व लोकाभिमुख नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. बीटीभाऊ हे अत्यंत प्रेमळ, मनमिळावू आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांनी प्रेम, आपुलकी आणि प्रेरणा दिली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे अनेकांना सार्वजनिक जीवनात काम करण्याची ऊर्जा मिळाली. डॅडी देशमुख यांच्या माध्यमातून बीटीभाऊंचा परिचय झाला. त्यांनी नेहमीच तरुण लेखक, वक्ते आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे मनापासून कौतुक करून त्यांना पुढे जाण्याची प्रेरणा दिली. अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहवास लाभला. त्यांची साधी राहणी, विचारांची स्पष्टता आणि प्रत्येकाशी जिव्हाळ्याने वागण्याची शैली कायम स्मरणात राहील. अकोला शहरात भीषण पाणीटंचाई असताना डॅडी देशमुख यांच्या पुढाकाराने बीटीभाऊंनी आपल्या निधीतून अनेक हँडपंप उपलब्ध करून दिले होते. त्यापैकी अनेक हँडपंप आजही नागरिकांची तहान भागवत आहेत. समाजहितासाठी केलेल्या त्यांच्या कार्याची ही जिवंत साक्ष आहे. माजी आमदार वसंतराव खोटरे यांच्याशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध आणि त्या काळातील अनेक प्रेरणादायी आठवणी ते आवर्जून सांगत असत. पदवीधर मतदारसंघाचे आमदार म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या गौरवशाली कारकीर्दीची सुवर्ण पाने इतिहासात कायम नोंदली जातील. बीटीभाऊंच्या निधनामुळे समाजाने एक सुसंस्कृत लोकनेता, अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि प्रेमळ मार्गदर्शक गमावला आहे. त्यांच्या आठवणी, विचार आणि समाजासाठीचे योगदान कायम प्रेरणादायी राहील.

### बुद्ध विहार समन्वय समितीतर्फे २८ जूनला चापरडा धम्म अभ्यास सहल

**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीतर्फे रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी एकदिवसीय धम्म अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. या सहलीत सहभागी होणाऱ्या धम्मप्रेमींना विविध बौद्ध स्थळांना भेट देण्याची आणि धम्मविषयक अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. या सहलीदरम्यान जेतवन बुद्ध विहार (यवतमाळ), ज्ञानभूमी विपश्यना केंद्र (चापरडा), बुद्धभूमी व श्रामणेर स्कूल (केळवद) तसेच उमेद सामाजिक संस्था (रोठा) या ठिकाणांना भेट दिली जाणार आहे. सहलीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या इच्छुकांनी दि. २४ जून २०२६ पूर्वी आपली नोंदणी करून ए. के. पाटील (मो. ७९७२९८७५८४), विश्वनाथ लोखंडे (मो. ८७८८२६१९४७), सिद्धार्थ खोब्रागडे (मो. ९४२३१२२३७५) किंवा धेनूत्तम बोंबर्डे (मो. ९५६१५६१७८८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन बुद्ध विहार समन्वय समितीचे राष्ट्रीय सचिव ए. के. पाटील यांनी केले आहे. धम्माचा अभ्यास, बौद्ध स्थळांची माहिती आणि सामाजिक-सांस्कृतिक संवाद या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या धम्म अभ्यास सहलीस मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### AK Club तर्फे व्हॉइस ऑफ विदर्भ एकल गायन स्पर्धेचे आयोजन २८ जूनला

**नागपूर :** संगीतप्रेमी आणि गायन क्षेत्रातील नवोदित तसेच अनुभवी कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एके क्लबतर्फे 'व्हॉइस ऑफ विदर्भ' एकल गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, २८ जून रोजी सकाळी ९.३० वाजता. विदर्भ साहित्य संघ, सीताबर्डी येथे होणार आहे. स्पर्धेत १८ ते ६० वर्षे वयोगटातील पुरुष व महिला स्पर्धक सहभागी होऊ शकतील. विजेत्यांना आकर्षक चषक, रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच ६१ ते ८५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठीही विशेष सन्मान व बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेची ऑडिशन फेरीही २८ जून रोजी याच ठिकाणी होणार असून इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## निधन वार्ता

### सचिन दिलीप जळगांवकर



नागपूर : काया मारुती ओंकारनगर येथील सचिन दिलीप जळगांवकर यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे ४५ वर्ष वय होते. त्यांच्या मागे पत्नी सुलभा, मुलगी सानवी, भाऊ सुमित तसेच बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराला मोठ्या संख्येने नागरिक

# नव्या 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम-२०२६'ला 'आसरा' संघटनेचा तीव्र विरोध; मुख्यमंत्र्यांना निवेदन

**नागपूर :** महाराष्ट्र शासनाने १२ जून २०२६ रोजी अधिसूचित केलेल्या 'महाराष्ट्र माहिती अधिकार नियम, २०२६' मधील नव्या तरतुदींना असोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स (ASRA) या राष्ट्रीय संघटनेने तीव्र विरोध दर्शविला आहे. या नियमांमुळे माहिती अधिकार कायद्याचा मूळ उद्देश बाधित होऊन पारदर्शकता कमी होईल तसेच भ्रष्टाचारा विरोधातील लढा कमकुवत होईल, असा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल यांनी मुख्यमंत्री व राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदन पाठवून हे नियम तातडीने मागे घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. नियमांवरील प्रमुख आक्षेप : संघटनेने नव्या नियमांतील काही तरतुदींवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. त्यानुसार, माहिती अधिकार अर्जासाठी १५० शब्दांची मर्यादा घालण्यात आली असून अर्ज एकाच विषयापुरता मर्यादित ठेवण्याची अट घालण्यात आली आहे. केंद्रीय नियमांमध्ये ५०० शब्दांची मर्यादा असताना राज्याने ती मोठ्या प्रमाणात कमी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय अर्जासोबत ओळखपत्र जोडणे बंधनकारक करण्यात आले असून, ही अट माहिती अधिकार कायद्यातील कलम ६(२) च्या विरोधात असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. शुल्कवाढीवरही नाराजी : नवीन नियमांनुसार अर्ज शुल्क १० रुपयांवरून ३० रुपये करण्यात आले आहे. कागदपत्रांच्या प्रतींसाठी प्रति पान २ रुपयांऐवजी ५ रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच प्रथम अपिलासाठी ५० रुपये आणि द्वितीय अपिलासाठी १०० रुपये शुल्क निश्चित करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडणार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रमाणित प्रती ऐवजी संकेत स्थळाची लिंक संघटनेच्या मते, मागितलेली माहिती शासकीय संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास प्रमाणित प्रत न देता केवळ संकेतस्थळाची लिंक देण्याची तरतूदही गंभीर आहे. न्यायालयीन प्रक्रियेत प्रमाणित कागदपत्रांना महत्त्व असते. त्यामुळे अशा नियमामुळे माहितीचा प्रभावी वापर करणे कठीण होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. केंद्रीय मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन? 'आसरा' संघटनेचा दावा आहे की, केंद्र सरकारच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाच्या (DoPT) मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यांचे नियम केंद्रीय माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत असणे आवश्यक आहे. केवळ तांत्रिक कारणांवर किंवा शब्दमर्यादा ओलांडल्याच्या कारणावरून अर्ज फेटाळणे योग्य नसल्याचेही संघटनेने नमूद केले आहे. न्यायालयात जाण्याचा इशारा : 'हे नियम नागरिकांच्या माहितीच्या अधिकारावर मर्यादा आणणारे असून, शासनाने त्यांचा तातडीने फेरविचार करावा. अन्यथा या नियमांना न्यायालयात आव्हान दिले जाईल,' असा इशारा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल यांनी दिला आहे. या नव्या नियमांमुळे माहिती अधिकार कार्यकर्ते, सामाजिक संस्था आणि नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, या विषयावर राज्यभर व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

# ओबीसी जनगणनेच्या मागणीसाठी डॉ. ॲड. साळवे पुन्हा आक्रमक नोटीसला उत्तराचा ॲड. अंजली साळवे यांचा मसुदा व्हायरल



**नागपूर :** जनगणना २०२७च्या पहिल्या टप्प्याचा कार्यक्रम सुरू असतानाच जनगणना नमुना प्रश्नावलीत ओबीसी (इतर मागासवर्गीय) प्रवर्गाचा स्वतंत्र कॉलम समाविष्ट करण्यात आलेला नसल्याने राज्यातील ओबीसी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ओबीसी जनगणनेची मागणी न्यायालय, संसद आणि विधिमंडळापर्यंत पोहोचविणाऱ्या तसेच 'ओबीसींचा कॉलम नाही तर आमचा सहभाग नाही' या भूमिकेतून 'पाटी लावा अभियान' सुरू करणाऱ्या डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी या प्रश्नावर पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. देशभरातील विविध ओबीसी संघटना आणि प्रतिनिधींनी गेल्या अनेक वर्षांपासून ओबीसी जनगणनेची मागणी केंद्र सरकारकडे सातत्याने लावून धरली आहे. कोरोनामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या जनगणना प्रक्रियेनंतर आता जनगणना २०२७ दोन टप्प्यांत राबविण्यात येत आहे. मात्र, पहिल्या टप्प्यातील घर यादी प्रश्नावलीमध्ये अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि Other असे प्रवर्ग नमूद असताना ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्याचा आक्षेप संघटनांनी घेतला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी ओबीसी नागरिकांनी 'सरकार ओबीसींची गणना करा, अन्यथा आमचा सहभाग नाही' अशी भूमिका घेतल्याने प्रशासनाकडून जनगणना प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. काही ठिकाणी कारणे दाखवा नोटीसाही बजावण्यात आल्याचे समोर आले आहे. या नोटिसांना उत्तर देण्यासाठी डॉ. अंजली साळवे यांनी तयार केलेला सविस्तर मसुदा सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून तो चर्चेचा विषय ठरला आहे. या मसुद्यात जनगणनेला किंवा इतर कोणत्याही प्रवर्गाच्या गणनेला विरोध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, संविधानातील समानता, सामाजिक न्याय आणि कलम १५, १६ तसेच ३४० च्या अनुषंगाने ओबीसींची अचूक संख्या उपलब्ध असणे आवश्यक असल्याने पहिल्या टप्प्यातच ओबीसींचा स्वतंत्र कॉलम समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे. ओबीसींची लोकसंख्या, आरक्षण, शैक्षणिक व सामाजिक कल्याणकारी योजनांचे नियोजन आणि धोरणनिर्मितीसाठी ही माहिती अत्यावश्यक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, २०१९ मध्ये डॉ. साळवे यांनी स्वतःच्या घरावर 'जनगणनेत ओबीसींचा कॉलम नाही म्हणून आमचा सहभाग नाही' अशी पाटी लावून 'पाटी लावा अभियान' सुरू केले होते. त्यानंतर राज्यातील अनेक ओबीसी संघटना आणि कार्यकर्त्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. आता जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन पुन्हा सक्रिय झाले असून प्रत्यक्ष कृतीतून ओबीसी जनगणनेचा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार संघटनांनी व्यक्त केला आहे.

## डॉ. ललित खोब्रागडे यांची नगररचना विभागात उपसंचालकपदी पदोन्नती



**नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या नगररचना विभागातील अधिकारी डॉ. ललित खोब्रागडे यांची उपसंचालक पदावर पदोन्नती झाली असून, त्यांच्या या यशाबद्दल प्रशासकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. डॉ. खोब्रागडे यापूर्वी उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागात सहायक संचालक म्हणून कार्यरत होते. कार्यालयीन जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडतानाच डॉ. खोब्रागडे यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही मोलाचे योगदान दिले आहे. 'जंगे आजादी', 'आम्ही भारताचे लोक', 'राजगृहाचे निळे स्पंदन' आणि 'आझादी और संविधान' यांसारख्या वैचारिक नाट्यकृतींच्या माध्यमातून त्यांनी संविधान, सामाजिक न्याय आणि प्रबोधनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला आहे. डॉ. खोब्रागडे यांच्या पदोन्नतीबद्दल महाराष्ट्र ऑफिसर्स फोरम, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, बोधी फाऊंडेशन तसेच विविध नाट्य आणि सामाजिक संस्थांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## जागतिक सिकलसेल दिनानिमित्त आज जनजागृती शिबिर व कार्यशाळा

**नागपूर :** जागतिक सिकलसेल दिन निमित्त सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया, नागपूर आणि बाहार फाउंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २१ जून २०२६ रोजी जनजागृती शिबिर व कार्यशाळेचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, उरुवेला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर येथे होणार आहे. यावेळी सिकलसेल बाधित रुग्णांची नोंदणी मेळाव्याचेही उद्घाटन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. शशिकांत शंभरकर (उपसंचालक, आरोग्य विभाग, नागपूर) यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी इंजि. अरविंद गेडाम (अध्यक्ष, बानाई, नागपूर) राहणार आहेत. प्रमुख अतिथी डॉ. प्रसंग निहाते (अस्थिव्यंग शल्यचिकित्सक) आणि हिमांशू लोखंडे (मानसोपचारतज्ज्ञ) उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. सुनील खापर्डे (माजी संचालक, आरोग्य व कुटुंब कल्याण, दिल्ली) आणि डॉ. उदय बोधनकर (वरिष्ठ बालरोगतज्ज्ञ) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सिकलसेल आजाराविषयी जनजागृती, निदान, उपचार, प्रतिबंध आणि रुग्ण नोंदणी याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया, नागपूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ अँड रिसर्च फाउंडेशन (बाहार), डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स (बानाई), डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन (बाहो), डॉ. बी. आर. आंबेडकर डॉक्टर्स

## सामाजिक कार्यकर्ते राजकुमार वंजारी यांच्या 65 व्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



**नागपूर :** स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था, समता सैनिक दल, दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (बीएसआय), विदर्भ प्रदेश तसेच शहर विकास मंचाचे सक्रिय पदाधिकारी आणि जनसामान्यांच्या व्यथा-वेदनांचे सजग प्रहरी म्हणून ओळखले जाणारे सामाजिक कार्यकर्ते राजकुमार वंजारी यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त सिंबायोसिस रोड, वाठोडा पोलीस स्टेशनजवळ वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. राजकुमार वंजारी हे दरवर्षी आपल्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतात. तसेच दहावी-बारावीमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करून समाजातील गुणवंतांना प्रोत्साहन देण्याची परंपरा त्यांनी जपली आहे. या कार्यक्रमाला भदंत नागदीपकर महास्थवीर, नेहरूनगर झोनच्या सभापती सीमा ढोमणे, सुरेश बाराई, बीएसआयचे राष्ट्रीय सरचिटणीस शंकरराव ढेंगरे, शहर विकास मंचाचे मुख्य संयोजक अनिल वासनिक, हरिदास बेलेकर, कृष्णा बोरकर, ज्ञानदेव गजभिये, प्रा. मुकुंद मेश्राम, जास्वंद पाटील, चंद्रभान भोवते, ज्ञानेश्वर शेंडे, बबीता भोवते, वनमाला वंजारी, प्रगती पारशी, प्रीती भिवगडे, मानव वंजारी, सुहानी पारशी, देवयानी वंजारी, अतुल नारनवरे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी राजकुमार वंजारी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

## महिला कर्तृत्ववान सन्मानाने साहित्यिका मनिषा कांबळे यांचा गौरव



**पुणे :** एसपीव्हीसी फाऊंडेशनच्या वतीने उत्सव मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'महिला कर्तृत्ववान सन्मान' सोहळ्यात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल साहित्यिका, कवयित्री व रंगकर्मी मनिषा कांबळे यांना 'महिला कर्तृत्ववान सन्मान' प्रदान करून गौरविण्यात आले. एसपीव्हीसी फाऊंडेशनच्या प्रमुख जयश्री घाटे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट समन्वयन शीतल खरे यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून भाजपच्या नगरसेविका कीर्ती राऊत, मिस एशिया गायत्री रोहणकर, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर भक्ती दुधे तसेच शुभांगी सोनटक्के यांची विशेष उपस्थिती लाभली.

त्यांच्या बहुआयामी आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनीषा कांबळे यांच्या साहित्यिक आणि कलाक्षेत्रातील योगदानाचे विशेष कौतुक केले. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनिषा कांबळे यांना प्राप्त झालेला हा सन्मान त्यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याची पोचपावती मानला जात असून त्यांच्या कार्याला भविष्यातही अशीच यशस्वी वाटचाल लाभो, अशा शुभेच्छा उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## सामाजिक न्याय राज्यमंत्र्यांनी घेतला बार्टीच्या विविध योजनांचा आढावा



**पुणे :** राज्याच्या समाजकल्याण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा दि. १७ जून २०२६ रोजी विधानभवन, पुणे येथील सभागृहात घेतला.

या आढावा बैठकीत बार्टी संस्थेच्यावतीने स्पर्धा परीक्षा, फिलोशीप, आयबीपीएस, पोलीस भरती, जेईई, तसेच कौशल्य विकास विभागाच्यावतीने अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, आदींची माहिती घेतली. तसेच मिसाळ यांनी बार्टीने विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात यावे आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या नामवंत संस्थाची निवड करावी, असे निर्देश आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना दिले. तसेच जात पडताळणी प्रक्रिया अधिकाधिक सुलभ कशी करता येईल व विद्यार्थ्यांना तात्काळ प्रमाणपत्र कसे देता येतील याबाबतही त्यांनी निर्देश दिले. प्रारंभी निबंधक डॉ. सुचिता शिंदे यांनी बार्टीचे सादरीकरण केले. या आढावा बैठकीला समाजकल्याणच्या आयुक्त तथा बार्टीच्या प्रभारी महासंचालक दीपा मुधोळ-मुंडे, बार्टीच्या निबंधक डॉ. सुचिता शिंदे, विभागप्रमुख रविंद्र कदम, डॉ. बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण यांच्यासह समाजकल्याण व बार्टी संस्थेतील अधिकारी उपस्थित होते.

## प्रभाकर मनोहर शिंदे यांना 'राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय



**नागपूर :** सामाजिक, शैक्षणिक व जनकल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय आणि सातत्यपूर्ण योगदान देणारे नागपूरचे ज्येष्ठ समाजसेवक प्रभाकर मनोहर शिंदे यांची प्रतिष्ठेच्या 'राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार २०२६' साठी निवड करण्यात आली आहे. राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद २०२६ अंतर्गत विदर्भ विभागातून हा मानाचा पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला आहे. या निवडीची अधिकृत माहिती देण्यासाठी विवेक विचार मंच, विदर्भ प्रांताचे पालक सुनील कीटकरू आणि राजू छाया साळवे यांनी प्रभाकर शिंदे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती दिली. हा पुरस्कार येत्या २८ जून रोजी, महाड (जिल्हा रायगड) येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी विवेक विचार मंचच्या वतीने प्रभाकर शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सामाजिक न्याय, शिक्षण आणि जनहिताच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. तसेच त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या. प्रभाकर शिंदे यांच्या या गौरवपूर्ण निवडीमुळे नागपूरसह संपूर्ण विदर्भातील सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार त्यांच्या दीर्घकालीन समाजसेवेचा सन्मान मानला जात आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648